cmyk

## संपादकीय

### पळ काढण्याच्या वृत्तीने बेविश्वास...

भारताच्या लोकशाही प्रक्रियेचा कणा म्हणून निवडणूक आयोगाकडे पाहिले जाते. परंतु, बिहारमधील मतदार यादीच्या विशेष गहन पुनरीक्षण (एसआयआर) प्रक्रियेवरून निर्माण झालेल्या वादाने या संस्थेच्या निष्पक्षपातीपणा आणि पारदर्शकतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. ११ ऑगस्ट रोजी विरोधी पक्षांनी मतचोरीच्या आरोपांवरून संसदेच्या द्वारापासून निवडणूक आयोगाच्या कार्यालयापर्यंत भव्य असा मोर्चा काढला.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### मंत्रालयात तब्बल ८३ टक्के कर्मचारी गैरहजर

मुंबई : मुसळधार पावसाने मुंबईला झोडपल्यानंतर मंत्रालयाला म्हणजे सरकारी कामकाजाला याचा मोठा फटका बसला. रविवारी (१७ ऑगस्ट) रात्रीपासून कोसळणा-या मुसळधार पावसाची मोठी झळ मंत्रालयाला सोमवारी बसली. उशिराने धावणा-या लोकल ट्रेन, ठिकठिकाणी तुंबलेले पाणी, वाहतुकीची कोंडी यामुळे मंत्रालयात सोमवारी (१८ ऑगस्ट) सरकारी कर्मचारी आणि अधिका-यांची उपस्थिती जेमतेम होती. केवळ १७.६७ टक्के कर्मचारी उपस्थित होते. त्यामुळे बहुतांश विभागांमधील खुर्च्या रिकाम्या होत्या. त्यातच पावसाचा वाढता जोर लक्षात घेऊन आलेल्या कर्मचा-यांना दुपारी ४ वाजता कामावर घरी जाण्याची मुभा देण्यात आली होती.

बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-११५ | बुधवार, दि.२० ऑगस्ट २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## •पावसाने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले; तोंडचा घास हिरावला!

# १४ लाख एकरवरील पिके पाण्यात; दोन दिवसात पंचनामे

### • शासनाचे निर्देश •

**बीड । प्रतिनिधी**

**गेल्या २-३ दिवसांपासून राज्यात मुसळधार पाऊस झाला असून नांदेड जिल्ह्यातील मुखेड, बीड जिल्ह्यातील परळी आणि माजलगाव तालुक्यात अक्षरश: आभाळ फाटले. रातोरात तळात असलेली धरणे भरली असून नद्यांना महापुर आला. या अतिमुसळधार पावसाने राज्यातील १४ लाख एकरवरील पिके पाण्याखाली असून दोन दिवसात पंचानामे करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासनाला दिले आहेत. ढगफुटसदृश्य झालेल्या या पावसाने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले असून तोंडला घास हिरावला असून अनेकांना बेघर केले आहे.**

जून आणि जुलै महिन्यात मध्यम स्वरुपात पडलेल्या पावसाने ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यात आक्राळ-विक्राळ रुप धारण केले. नांदेड जिल्ह्यात मुखेड तालुक्यात अक्षरश: आभाळ फाटले. यात तीन ते चार जणांना आपला जीव गमवावा लागला असून हजारो लोकांना बेघर व्हावे लागले आहे. एनडीआरएफ आणि स्थानिक प्रशासनासह पोलिसांनी शर्थीचे प्रयत्न करुन अनेकांचे जीव वाचवले आहे. तर बीड जिल्ह्यातील माजलगाव आणि परळी तालुक्यात अतिवृष्टी झाली. हुडा कौडगाव येथे नदीला महापुर आल्याने एक कार त्यात वाहून गेली. यातील तिघांना ▶▶ पान २ वर

### बीडमधील परळी, माजलगाव तर नांदेडमधील मुखेड तालुक्यात भयावह परिस्थिती




#### » मराठवाड्यात पावसाने ११ जणांचा बळी

मराठवाड्यात पावसामुळे आतापर्यंत ११ लोकांचा बळी गेला आहे. ४९८ छोट्या मोठ्या जनावरांचा मृत्यू झाला आहे. तर ३५० पेक्षा अधिक घरांची आणि गोठ्यांची पडझड झाली आहे. सोबतच ११५४ गावांना पावसाचा फटका बसला आहे. मराठवाड्यातील ४ लाख ३८ हजार ४५१ शेतकरी पावसामुळे बाधित झाले आहे. तसेच ३ लाख ५८ हजार ३७०.५५ हेक्टर वरील पिकांचे नुकसान झाला आहे.

#### » परिस्थिती नियंत्रणात-फडणवीस

राज्यातील परिस्थिती बऱ्यापैकी नियंत्रणात आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी दिली आहे. तातडीने पंचनामे करण्याचे आदेश दिले असून आवश्यक ती मदत केली जात असल्याचेही ते म्हणाले.

#### » धरणातील पाणी सोडताना खबरदारी घ्यावी-अजित पवार

पंचनामे करण्याचे काम सुरू होतील. जिथे पुराचा फटका, पावसाचा फटका बसला आहे, तिथे बोटीद्वारे नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात येत आहे. तर जलसंपदा विभागाला खबरदारी घेण्याचे आदेश देण्यात आले आहे. बहुतेक ठिकाणी धरणं ओव्हरफ्लो झाली आहे. त्यामुळे पाणी सोडताना खबरदारी घेण्यास सांगण्यात आल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवारांनी दिली आहे.

#### » ३६ जिल्ह्यांतील प्रशासन अलर्ट मोडवर

राज्यातील ३६ जिल्ह्यांतील प्रशासन अलर्ट मोडवर आहे. सगळे जण परस्थितीवर लक्ष ठेऊन आहेत. काही ठिकाणी जीवितहानी झाली आहे. असंख्य जनावरे वाहून गेली आहेत. संपूर्ण राज्यात पावसाची संततधार आहे. काही गावं पाण्याखाली असून सगळीकडे मदतकार्य सुरु आहे.

#### » हसनाळ गाव उद्ध्वस्त; ९ जणांचा मृत्यू

नांदेड जिल्ह्यातील मुखमेडमध्ये आभाळ फाटले असून तेथील हसनाळ गाव उद्ध्वस्त झाले आहे. घरासह संसारच पुराने गिळला असून हसनाळा भागात सैनिक दलाच्या वतीने मेडिकल कॅम्प उभारला आहे. तर नांदेड जिल्ह्यात ९ जणांचा पुराच्या पाण्यात वाहून जाऊन मृत्यू झाला आहे.

## थोडक्यात...

### लातूर : ६० पेक्षा जास्त घरांमध्ये पाणी शिरले

लातूर-जिल्ह्यातल्या बोरगाव मध्ये लेंडी नदीच्या पुरामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे, ६० पेक्षा जास्त घरांमध्ये पुराचे पाणी घुसल्याने अन्न धान्य आणि जीवनावश्यक वस्तूंचे मोठे नुकसान झाले आहे. विद्युत खांब आणि डिपी जागोजागी उखडून पडल्याने गावकऱ्यांना रात्र अंधारात जागून काढावी लागली आहे.

### हेलिकॉप्टरचे खेडेगावात इमर्जन्सी लँडिंग

लोणावळा- सालतर गावात हेलिकॉप्टरचे इमर्जन्सी लँडिंग करण्यात आले. मुसळधार पाऊस आणि दाट धुक्यामुळे इमर्जन्सी लँडिग करण्यात आले. लोणावळ्यापासून अवघ्या ३० किमी. अंतरावर हेलिकॉप्टर लँड करण्यात आले.

### ऑनलाइन गेमिंग विधेयकाला मंजुरी

नवी दिल्ली- सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ऑनलाइन गेमिंग विधेयकाला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. नवीन विधेयकात ऑनलाइन गेमवर बंदी घालण्याची तरतूद आहे.

### शेवगाव तालुक्यातील पूल गेला वाहून

अहिल्यानगर- जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यात जोहरापूर- देवटाकळी या रोडवरील पूल दोन दिवसांपूर्वी वाहून गेला असून यामुळे परिसरातील शेतकरी संतप्त झाले आहेत. पावसाच्या पाण्यामुळे मुग, सोयाबीन आणि कापूस या पिकांचे मोठे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांनी थेट नदीत उतरून आंदोलन केले.

## झेडपीचे २८२ शिक्षक बदल्यांच्या प्रतिक्षेत

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्हा परिषदेतील संवर्ग चार मध्ये ३३५० शिक्षकांच्या बदल्या झाल्या असून आता पसंतीनुसार बदली न मिळाल्यामुळे २८२ शिक्षकांसाठी पसंती क्रम भरण्यासाठी १९ ऑगस्ट पर्यंत मुदत आहे शिक्षक बदली प्रक्रियेत आतापर्यंत संवर्ग १ संवर्ग २ संवर्ग ३ संवर्ग ४ मधील शिक्षकांच्या बदली ची प्रक्रिया पार पडली असून संवर्ग ४ साठी ४५५२शिक्षक बदली पात्र होते परंतु यापैकी ९४४ शिक्षकांच्या संवर्ग १ व संवर्ग २ मधून बदल्या झाल्या आहेत.**

या समाजातील ३६५० पैकी ३३५० शिक्षकांच्या बदल्या झाल्या तर २८२ शिक्षकांच्या बदल्या अजून शिल्लक आहे या शिक्षकांसाठी पुन्हा दुसरी फेरी सुरू झाली असून १६ ऑगस्ट ते १९ ऑगस्ट पर्यंत पसंती क्रमांक देण्याची प्रक्रिया सुरू आहे २८२ शिक्षकांमध्ये १६७ प्राथमिक पदवीधर तर ११५ सहशिक्षकांचा समावेश आहे सध्या मराठी माध्यमाच्या सहशिक्षकाच्या १०४ जागा शिल्लक आहे. तर १६७ प्राथमिक पदवीधरासाठी भाषा विषयाच्या ३ उर्दूची १ तसेच गणित व विज्ञान च्या ३८२ ▶▶ पान २ वर

## बीडमधील शेतकरी संकटात; केंद्राकडून मदतीचा हात द्या

### खा.सुप्रिया सुळे, खा.सोनवणेंनी केंद्रीय मंत्री अमित शहा यांची घेतली भेट

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात मागील चार दिवसांपासून पाऊस जोरदार हजेरी लावत असून जिल्ह्यामधील बहुतेक सर्वच महसुल मंडळामधे अतिवृष्टीची नोंद झालेली आहे. शेतातील पिके पाण्यात आहेत. दोन दिवसांपुर्वी खा.बजरंग सोनवणे यांनी थेट शेतात जावून नुकसानीची पाहणी केली होती. आज दि.१९ रोजी केंद्रीय मंत्री अमित शहा यांची दिल्ली येथे भेट घेवून अतिवृष्टीमुळे संकटात



सापडलेल्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना केंद्र सरकारकडून मदतीचा हा द्या, अशी मागणी खासदार सुप्रिया सुळे व खा.बजरंग सोनवणे यांनी केली.

बीड जिल्ह्यातील शेतकरी बांधवांवर अतिवृष्टीमुळे मोठे संकट ओढावले आहे. राहती घरे, पीक, पशुधन, शेतीजमीन तसेच फळबागांचे प्रचंड नुकसान झाले आहे.या नुकसानीची दखल घेऊन शेतकऱ्यांना केंद्र सरकारकडून तातडीने मदत मिळावी, यासाठी खा.सुप्रिया सुळे यांच्या सोबत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. मागील काही दिवसांपासून जिल्ह्यात संततधार आणि ▶▶ पान २ वर

## लाडकीचा लाभ घेणाऱ्या सरकारी बाबूंवर कारवाईचा हातोडा

### शासनाचे जिल्हा परिषद सीईओंना पत्र

**बीड । प्रतिनिधी**

**लाडकी बहिण योजना महायुतीसाठी वरदान ठरली असली तरी या योजनेचा अनेकांनी नियमबाह्यरित्या लाभ घेतला आहे. सरकारी नौकरीत असलेल्या ११८३ जणांनी या योजनेचा लाभ घेतल्याचे उघड झाले असून आता शासनाने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पत्र पाठवून तातडीने कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.**

लाडकी बहिण योजना ही शासनाची महत्वकांक्षी योजना असून राज्यात महायुती सरकार या योजनेमुळेच आले आहेत. मात्र या योजनेचा लाभ सरकारी नौकरदारांनी सुध्दा घेतला असून ▶▶ पान २ वर

## परळीजवळ कारसह अकरा लाखांचा गुटखा पकडला

**परळी । प्रतिनिधी**

राज्यात बंदी असलेला गुटखा जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात वितरित होत असून एलसीबीच्या पथकाला मिळालेल्या गोपनीय माहिती नंतर एलसीबी चे शिवाजी बंटीवार व त्यांच्या सहकार्याने धर्मापुरी जवळ एका कारला आडून तपासणी केली असता त्यामध्ये बंदी असलेला पान मसाला गुटखा आढळून आला



कारसह अकरा लाख तीस हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

परळी तालुक्यातील धर्मापुरी येथे स्थानिक गुन्हे शाखा पथकाने ▶▶ पान २ वर

## दीड वर्षापासून अधिकाऱ्याचा जिल्हा बँकेच्या रेस्ट हाऊसमध्ये बेकायदेशीर मुक्काम

**बीड । प्रतिनिधी**

बदलून आलेले सहकार खात्याचे तालुका उपनिबंधक सहकारी संस्था, बीड या पदावर कार्यरत असलेले अधिकारी घोडके गेल्या दीड वर्षापासून बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या विश्रामगृहात बेकायदेशीर रितीने मुक्कामाला आहेत. त्यांनी आजच चंबू गबाळ आवरावे आणि अन्य ठिकाणी राहायला जावे. अन्यथा आम्हाला आंदोलन करावे लागेल, असा इशारा ॲड. अजित देशमुख यांनी दिला आहे.

बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड, बीड ही सातत्याने वादाच्या भोवऱ्यात आहे. जिल्हा बँक शेतकऱ्यांची बँक राहिलेली नसून पुढाऱ्यांची बँक झालेली आहे. त्यामुळे सातत्याने मागणी लावून धरत तेथील संचालक मंडळ अस्तित्वात येऊ दिले नाही. मात्र या ठिकाणी नेमलेले प्रशासकीय अधिकारी देखील कमकुवत ठरत ▶▶ पान २ वर

## अधिकाऱ्यांची मिलीभगत, गौण खनिजचा बिनबोभाट उपसा

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यामध्ये कोणतीही परवानगी न घेता किंवा मुदत संपलेली असतानाही खडी क्रेशर गौण खनिज आणि मुरमाचा उपसा अधिकाऱ्यांशी संगणमत करून मोठ्या प्रमाणात केला जात आहे बीड पासून जवळच असलेल्या बायपासवरील गायरान जमिनीवरचा मुरूम मोठ्या प्रमाणात व फसला जात आहे तक्रार करूनही कारवाई होत नसल्याचे दिसून येत आहे.**

मागील काही काळामध्ये बीड जिल्हाधिकारी यांनी आदेश काढून नूतनीकरण आणि काही खडी क्रेशर गौण खनिज आदिनाथ दंड ठोठावला होता मात्र कोणीही दंड भरला नाही उलट अधिकाऱ्यांशी संगणमत करून पुन्हा हे खडी क्रेशर आणि



गौण उपसा सुरूच ठेवला अशाच प्रकरणांमध्ये बीड बायपास रोडवर हॉटेल शेतकरी याच्या ▶▶ पान २ वर

## सोयाबीनचे पावसामुळे मोठे नुकसान

### कापसालाही मोठा फटका; शेतकरी मदतीच्या प्रतिक्षेत

**बीड। प्रतिनिधी**

**गेल्या दोन दिवसापासून बीड जिल्ह्यात पडत असलेल्या पावसामुळे शेतकरी हवालदिल झाल्याचे चित्र आहे. मुसळधार पावसाने सोयाबीन पिक धोक्यात आले असून भुसरी रोग पडण्याची शक्यता आहे.**

माजलगाव तालुक्यातील गंगामसला, आडोळा शिवारात झालेल्या अतिवृष्टीमुळे अक्षरशः शेतीला तळ्याचे स्वरूप आलेले दिसून येत आहे. या पावसाने सोयाबीन पिकाचे नुकसान झाले. संकटात असलेल्या शेतकऱ्याला आधी वेगवेगळे निकष लावत डावलण्यात आले होते. त्याचप्रमाणे आता शेतकऱ्याला पीक विमा न भेटण्यासाठी लावण्यात येत असल्याचे शेतकऱ्याने सांगितले आहे. एकंदरीतच शेतकऱ्याला मातीत घालण्याचे सरकारचे धोरण असल्याचे संतप्त प्रतिक्रिया शेतकऱ्यांनी दिली आहे. तरीही बीडचे ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१९ ऑगस्ट २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २०.५० क्विंटल | २,४०० | २,७०१ | २,५६४ |
| ज्वारी/हायब्रिड :५४.०० क्विंटल | २,१०० | २,९५० | २,३८९ |
| मका/लोकल:१.५० क्विंटल | २,१०४ | २,१०४ | २,१०४ |
| तूर : १.५० क्विंटल | ५,८०० | ५,९६० | ५,८८० |
| उडीद : ०.५० क्विंटल | ४,४५० | ४,४५० | ४,४५० |
| बाजरी: १३.५० क्विंटल | २,००० | २,९०१ | २,३९९ |
| मुग: ०.५० क्विंटल | ७,४०१ | ७,४०१ | ७,४०१ |
| सोयाबीन: १.०० क्विंटल | ४,५५० | ४,५५० | ४,५५० |
| हरभरा: २.५० क्विंटल | ४,७०० | ५,६०१ | ५,१५० |

## तिरुपतीला तब्बल १४० कोटीचे सोने दान करणार भक्त

### मुख्यमंत्र्यांनी केली घोषणा

**तिरुपती । प्रतिनिधी**

आंध्रप्रदेशाचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी सांगितले की एका भक्ताने भगवान व्यंकटेश्वर स्वामी यांना सुमारे १४० कोटी रुपयांचे १२१ किलो सोने दान करण्याचा निर्णय घेतला आहे.

तिरुपती बालाजीचे भक्तांचे दान नेहमीच चर्चेत असते. आता भगवान वेंकटेश्वर स्वामी एका भक्ताने त्याला व्यवसायात आलेल्या यशा म्हणून आनंदी होत बालाजीला १४० कोटी रुपयांचे १२१ किलो दान करण्याचा ▶▶ पान २ वर

## मंत्री पंकजाताई मुंडे यांना कोहिनूर ऑफ इंडिया अवॉर्ड




**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांना त्यांच्या खात्यातील उत्कृष्ट कामाबद्दल लोकमत वृतपत्र समुहाच्या वतीने कोहिनूर ऑफ इंडिया पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. लंडन येथे काल एका दिमाखदार सोहळ्यात हा पुरस्कार देण्यात आला.**

लोकमत वृतपत्र समूहाच्या वतीने लंडन येथे आयोजित करण्यात आलेल्या लोकमत ग्लोबल इकॉनॉमिक कन्व्हेन्शन ही जागतिक परिषद पार पडली. ज्यांनी आपल्या कार्यातून देशाचे नाव जागतिक स्तरावर उज्वल केले आहे अशा व्यक्तींना लोकमत वृतपत्र समूहाने कोहिनूर ऑफ इंडिया या पुरस्काराने सन्मानित करण्याचे ठरवले होते. ना. पंकजाताई मुंडे यांनी आपल्या कुशल व अभ्यासू मार्गदर्शनखाली पर्यावरण व पशुसंवर्धन विभागात उल्लेखनीय काम करून एक नवा आयाम प्रस्थापित केल्याबद्दल त्यांचा या पुरस्काराने गौरव करण्यात आला. लोकमत वृतपत्र समूहाचे अध्यक्ष विजय दर्डा यांच्या ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# पळ काढण्याच्या वृत्तीने बेविश्वास...

भारताच्या लोकशाही प्रक्रियेचा कणा म्हणून निवडणूक आयोगाकडे पाहिले जाते. परंतु, बिहारमधील मतदार यादीच्या विशेष गहन पुनरीक्षण (एसआयआर) प्रक्रियेवरून निर्माण झालेल्या वादाने या संस्थेच्या निष्पक्षपातीपणा आणि पारदर्शकतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. ११ ऑगस्ट रोजी विरोधी पक्षांनी मतचोरीच्या आरोपांवरून संसदेच्या द्वारापासून निवडणूक आयोगाच्या कार्यालयापर्यंत भव्य असा मोर्चा काढला. या मोठ्या आयोजित मोर्चात काँग्रेस, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, राजद, समाजवादी पक्ष, तृणमूल काँग्रेस आणि डाव्या पक्षांचे सुमारे ३०० खासदार सहभागी झाले होते. राहुल गांधी, तेजस्वी यादव, अखिलेश यादव, मल्लिकार्जुन खर्गे, शरद पवार आणि महुआ मोईत्रा यांसारख्या नेत्यांनी निवडणूक आयोगावर सत्ताधारी भाजपाशी संगनमत असल्याचा थेट आरोप केला. दिल्ली पोलिसांनी हा मोर्चा अडवला आणि काही खासदारांना ताब्यातही घेतले, ज्यामुळे हा वाद आणखी तीव्र झाला. १७ ऑगस्ट रोजी निवडणूक आयोगाने या आरोपांवर पत्रकार परिषद घेतली. परंतु, या परिषदेत ठोस आणि तार्किक उत्तरे देण्याऐवजी आयोगाने राजकीय वक्तव्यांचा आधार घेतला, ज्यामुळे त्यांच्यावरील अविश्वास अधिक गडद झाला.

विरोधकांनी बिहारमधील एसआयआर प्रक्रियेत लाखो मतदारांचे नाव कापले जाण्याची भीती व्यक्त केली आहे. विशेषत: गरीब, दलित, आदिवासी आणि स्थलांतरित मजुरांचे मतदानाचे अधिकार हिरावले जाण्याचा धोका आहे, असा दावा काँग्रेसचे बिहार प्रभारी कृष्णा अल्लावरु यांनी केला. निवडणूक आयोगाने मतदारांना त्यांची आणि त्यांच्या पालकांची नागरिकत्वाची कागदपत्रे सादर करण्यास सांगितले आहे, परंतु आधार कार्ड आणि रेशन कार्ड यांसारखी सामान्य ओळखपत्रे नाकारण्यात आली आहेत. बिहारसारख्या मागास राज्यात, जिथे ८८ टक्के जन्मनोंदणी झालेली नाही, अशा परिस्थितीत जन्म प्रमाणपत्र किंवा १९८७ पूर्वीची कागदपत्रे मागणे अव्यवहार्य आणि संशयास्पद आहे. निवडणूक आयोगाच्या या कार्यपद्धतीवर टीका करताना आयोगाची तुलना माजी मुख्य निवडणूक आयुक्त टी. एन. शेषन यांच्या कार्यकाळाशी होऊ शकेल का? अर्थातच नाही. त्या पदावर बसलेल्या व्यक्तीच्या कृतीत तितका प्रामाणिकपणा नाही. १९९० च्या दशकात शेषन यांनी निवडणूक आयोगाला अभूतपूर्व स्वायत्तता आणि विश्वासार्हता प्रदान केली. त्यांनी कठोर नियम लागू करून निवडणुकीतील गैरप्रकारांना आळा घातला, ज्यामुळे राजकीय पक्ष आणि जनता यांनी त्यांच्या प्रामाणिकपणाची प्रशंसा केली. शेषन यांनी मतदार यादी सुधारणा, मतदान केंद्रांचे काटेकोर नियोजन आणि निवडणूक खर्चावर नियंत्रण यांसारखे उपाय यशस्वीपणे राबवले. त्यांच्या कृतीत प्रामाणिकपणा आणि जनतेच्या हिताचे रक्षण दिसून येत होते, ज्यामुळे त्यांचे म्हणणे विश्वासार्ह ठरले. आज मात्र निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीत तो प्रामाणिकपणा दिसत नाही.

बिहारमधील एसआयआर प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव आणि अव्यवहार्य मागण्या यामुळे आयोगाच्या हेतूंवर शंका घेतली जात आहे. ७.२४ कोटी मतदारांपैकी ९१.६९ टक्के मतदारांनी गणना फॉर्म जमा केले असले, तरी ३६ लाख मतदारांचा पत्ता नसल्याचा आणि ७ लाख मतदारांचे नाव अनेक ठिकाणी नोंदले असल्याचा दावा आयोगाने केला आहे. परंतु, कोणत्या मतदारांचे नाव कापले गेले, याची माहिती आयोगाने जाहीर केलेली नाही, ज्यामुळे राजकीय पक्षांना आपत्ती नोंदवणे कठीण झाले आहे. यावरून आयोगाच्या निष्पक्षपातीपणावर प्रश्न उपस्थित होतात. १ ऑगस्ट ते १ सप्टेंबर या कालावधीत दावे आणि आपत्ती नोंदवण्याची संधी असली, तरी आयोगाच्या अस्पष्ट धोरणांमुळे सामान्य मतदारांमध्ये गोंधळ निर्माण झाला आहे. १७ ऑगस्टच्या पत्रकार परिषदेत आयोगाने विरोधकांच्या आरोपांना तार्किक उत्तर देण्याऐवजी त्यांच्यावरच बूथ-स्तरीय एजंटांकडून माहिती गोळा न केल्याचा ठपका ठेवला. ही राजकीय वक्तव्ये आयोगाच्या जबाबदारीपासून पळ काढण्याचे लक्षण मानले जात आहे. बिहारमधील मतदार यादी पुनरीक्षणाच्या प्रक्रियेत आयोगाने पारदर्शकता दाखवली नाही. उदाहरणार्थ, मुजफ्फरपुरात एकाच पत्त्यावर २६९ मतदारांचे नाव नोंदले गेले, ज्यामुळे मोठी गडबड उघड झाली. अशा घटना आयोगाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करतात.

विरोधकांनी १७ ऑगस्टपासून बिहारात 'वोटर अधिकार यात्रा' सुरू केली आहे, ज्यामुळे हा वाद आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. निवडणूक आयोगाने आपली विश्वासार्हता पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी ठोस पावले उचलणे आवश्यक आहे, अन्यथा लोकशाहीच्या या महत्त्वाच्या संस्थेवरील जनतेचा विश्वास डळमळीत होईल. तशीही महाराष्ट्रातील शिवसेना आणि राष्ट्रवादी पक्षांच्या बाबतीत निवडणूक आयोगाने घेतलेले निर्णय हे यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयांच्या विपरीतच होते. तेथूनच खऱ्या अर्थाने त्यांच्या ऱ्हासाची चर्चा सुरू झाली.

## वाईट व्यसनापासून दूर राहून वडिलांचा सन्मान करा-स.पो नि वैशाली पवार

**जालना । प्रतिनिधी**

तीर्थपुरी येथील मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालयात महाराष्ट्र शासन अंतर्गत व पोलीस ठाणे तीर्थपुरी आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अमली पदार्थ सेवन विरोधी जनजागृती उपक्रम या कार्यक्रमा प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सहाय्यक पोलीस निरीक्षक वैशाली पवार बोलताना म्हणायला की,



विद्यार्थ्यांनी आपले भविष्य चांगले ठेवायचे असेल तर अमली पदार्थ सेवनापासून दूर राहिले पाहिजे, पुढचा काळ फार कठीण आहे .आयुष्यात आई वडिलांचा सन्मान करणे हे आपले प्रथम कर्तव्य आहे. याची जाणीव ठेवून आपल आयुष्य सुंदर ठेवण्याचा प्रयत्न सातत्याने करावा. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून व्यासपीठावर डॉ .सुनील खांडेभराड यांच्यासह रासेयोचे कार्यक्रमाधिकारी डॉ. अंकुश चव्हाण उपस्थित होते. या कार्यक्रमाची प्रास्ताविक डॉ. प्रबोधन कळंब यांनी केले, महाराष्ट्र शासनांतर्गत अमली पदार्थ सेवन जनजागृती उपक्रम या उपक्रमातून आमली पदार्थाला नाही म्हणा, व आयुष्य हो म्हणा, हे ब्रीदवाक्य समोर ठेवून आपलं चांगलं आयुष्य म्हणजेच आपल्या आई-वडिलांचा सन्मान हे प्रथम कर्तव्य आपले असल्याने, आपण व्यसनापासून दूर राहावे, यामुळे समाजात आपण चांगले आहोत, नाहीतर या समाजात आपली किंमत राहत नाही असे त्यांनी सांगितले . दरम्यान या कार्यक्रमात व्यसनापासून दूर राहण्याची सर्वांना शपथ देण्यात आली, या कार्यक्रमासाठी डॉ जायदा शेख, डॉ.रामलीला पवार, डॉ .प्रदीप जाधव, प्रा. रमेश जोगदंड, प्रा.राहुल कांबळे,डॉ. सुशीलकुमार शिंदे, उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा .योगेश घोगरे, प्रा.अमोल कुक्कडगावकर, प्रा. गाढवे यादव , यांनी परिश्रम घेतले या कार्यक्रमास विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदीप लगड यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ .अंकुश चव्हाण यांनी मानले.

# जिल्ह्यात सुरू असलेल्या अतिवृष्टी संदर्भात आ.क्षीरसागरांची जिल्हाधिकाऱ्यांसमवेत बैठक

## नुकसानीचे पंचनामे आणि उपाययोजना करण्याची केली प्रशासनाकडे मागणी

**बीड । प्रतिनिधी**

**मागील काही दिवसांपासून संपूर्ण बीड जिल्ह्यात अखंडित पाऊस पडत आहे. झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकरी बांधवांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतातील पिकांबरोबरच पशुधनाचेही मोठे नुकसान झाले आहे. तसेच अनेक ठिकाणी गावांना जोडणारे पूल वाहून गेले आहेत. या अनुषंगाने आ.संदीप क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यासोबत बैठक घेऊन झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून तातडीने उपाययोजना कराव्यात अशी मागणी जिल्हा प्रशासनाकडे केली.**



गेल्या काही दिवसांपासून संपूर्ण राज्यभरात संततधार पाऊस सुरू आहे. बीड जिल्ह्यातही मागील काही दिवसांपासून जोरदार पाऊस पडत आहे. अतिवृष्टीमुळे बीड मतदारसंघासह संपूर्ण जिल्ह्यात पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. सोबत पशुधनाचेही नूकसान झाले आहे. तसेच अनेक ठिकाणी गावांना जोडणारे अनेक पूल वाहून गेले आहेत. याबाबत प्रशासकीय स्तरावरून उपाययोजना करण्यात याव्यात. तसेच शेतकरी बांधवांच्या झालेल्या नुकसानींचे तातडीने पंचनामे करावेत अशी मागणी यावेळी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली.

### तेलगाव नाका अपघातासंदर्भातही घेतली संबंधित संयुक्त विभागांची बैठक

शनिवारी (दि.१९) रोजी बीड नगर परिषदेचे कर्मचारी शेख बाबू यांचा अपघाती मृत्यू झाला होता. बीड शहरातील तेलगाव रोडवर जलजीवन पाणीपुरवठा योजना आणि रस्त्याचे काम सुरू आहे. या रस्त्यावर एका बाजूनेच वाहतूक सुरू आहे. त्यामुळे याठिकाणी अपघात होत आहेत. काही दिवसांपूर्वीच एका तरूणाचाही या रस्त्यावर अपघाती मृत्यू झाला होता. आणि आता एका जेष्ठ नागरिकाचा बळी गेला आहे. त्याअनुषंगाने आ.संदीप क्षीरसागर यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, राष्ट्रीय रस्ते विकास प्राधिकरण व नगरपरिषद यांची संयुक्त बैठक घेऊन पुन्हा एखाद्या नागरिकाचा नाहक बळी जाणार नाही यासाठी उपाययोजना करा. असे निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

## प्रशांत थोरात प्रकरणी तहसीलदार-नायब तहसीलदार संघटनेचे मुख्य मंत्र्यांना निवेदन

# बीड मध्ये जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना निवेदन सादर

**बीड । प्रतिनिधी**

**तहसीलदार प्रशांत थोरात यांच्यावर झालेल्या एकतर्फी निलंबनाच्या कारवाईच्या निषेधार्थ महाराष्ट्र राज्य तहसीलदार आणि नायब तहसीलदार संघटनेच्या वतीने आज जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना निवेदन सादर करण्यात आले. हे निवेदन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नावाने देण्यात आले असून त्यात महसूल विभागाशी संबंधित अनेक मुद्दे अधोरेखित करण्यात आले आहेत.**



संघटनेने निवेदनातून नमूद केले की , प्रशांत थोरात यांच्यावर कोणतीही सखोल चौकशी न करता आणि आपले म्हणणे मांडण्याची संधी न देता एकतर्फी निलंबन करण्यात आले आहे . ही कारवाई न्यायाच्या तत्त्वांना धरून नसल्याचे सांगून तिचा तीव्र निषेध करण्यात आला . या प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करून वस्तुस्थिती उघड करावी आणि थोरात यांना न्याय मिळवून द्यावा , अशी मागणी संघटनेने केली आहे . निरोप समारंभ कार्यक्रमात गाणे म्हटले या कारणास्तव नुकतेच उमरीचे तहसीलदार प्रशांत थोरात यांना निलंबित करण्यात आले आहे. संघटनेने पुढे स्पष्ट केले की तहसीलदार हे शासनाच्या कामकाजातील सर्वात महत्वाचे घटक असून त्यांच्या जबाबदाऱ्या व्यापक आहेत . महसूल विभागाचे नियंत्रण ठेवणे , नैसर्गिक आपत्तीच्या काळात तातडीने मदत करणे , टंचाईच्या काळात पाणीपुरवठ्याची देखरेख करणे , गावठाण वाढीची प्रकरणे तयार करणे , रोजगार हमी योजनांची तपासणी करणे , सरकारी जमिनीवरील अतिक्रमण दूर करणे , खाणी व खनिजे यावरील शासनाचे हक्क जपणे , पाणी परवाना देणे , महसूल वसूली करणे , जमीनवाटप , कूळ हक्क ठरविणे , पिक पाहणी करणे , शेतकरी-खातेदारांच्या तक्रारींचे निवारण करणे , तसेच तालुक्यातील सर्व सरकारी विभागांमध्ये समन्वय राखणे अशी अनेक महत्त्वाची कार्ये तहसीलदारांकडे असतात . याशिवाय संजय गांधी योजना , लाडकी बहीण योजना, महाराजस्व अभियान , महसूल सप्ताह , शेतकरी आत्महत्या प्रस्ताव , जन्म-मृत्यू आदेश , विविध प्रमाणपत्रे , सेतू केंद्र , स्वस्त धान्य दुकाने , गोडाऊन तपासणी , परीक्षा नियोजन अशा शेकडो कामकाजाची जबाबदारी तहसीलदारांकडे असते . त्यामुळे कामाचा व्याप प्रचंड असून , अनावधानाने एखादी किरकोळ चूक घडली तर त्या संदर्भात अधिकाऱ्यांना मोठी व कठोर शिक्षा देणे योग्य ठरत नाही , असा निवेदनाचा रोख आहे. या प्रसंगी बीडचे अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , उपजिल्हाधिकारी प्रभोदय मुळे , उपजिल्हाधिकारी सतीश धुमाळ , तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी , तहसीलदार तेजस्विनी जाधव , तहसीलदार चंद्रकांत शेळके , तहसीलदार डी. सी. मेंडके , नायब तहसीलदार धनंजय काळे , आर. आर. बोठे , सुधाकर टाक व श्रीमती एन. एन. उगलमुगले हे उपस्थित होते.संघटनेने शासनाला आवाहन केले की , महसूल विभागातील अधिकाऱ्यांना न्याय्य व सुरक्षित कार्यपरिसर उपलब्ध करून द्यावा . प्रशांत थोरात यांच्या प्रकरणाची चौकशी करून त्यांना न्याय मिळवून दिला नाही , तर राज्यभरातील महसूल अधिकाऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण होईल , अशी स्पष्ट भूमिका संघटनेने मांडली आहे. राज्य संघटनेचे कार्याध्यक्ष सुरेश बगळे , कोषाध्यक्ष राहुल मुंडके , सहसचिव बाळासाहेब वाकचौरे तसेच उपाध्यक्ष आर जे पाटील , डी एस कुंभार , पंकज पवार , प्रवीण ठाकरे , किरण आंबेकर , सहसचिव पवन चांडक , शिवाजी शिंदे ,शशिकांत मंगरुळे , संजय खडसे , विद्याचरण कडवकर , राजीव सक्करवार हे शासनाकडे पाठपुरावा करून महसूल अधिकाऱ्यांवरील होणाऱ्या अन्यायाबद्दल दाद मागणार असल्याचे समजते.

# अल्पवयीन मुले धूम्रपान करताना पकडली

**बीड । प्रतिनिधी**

**बीड शहरातील सारडा कॅपिटल भागामध्ये अल्पम मुले धूम्रपान करीत असताना दामिनी पथकाने ताब्यात घेतली त्यांना समज देऊन आणि पालकांना बोलावून सोडून देण्यात आले.**

दिनांक १८/०८/२०२५ रोजी दुपारी दामिनी पथक शहरामधे नेहमीप्रमाणे पेट्रोलिंग करीत असताना, सारडा कॅपिटल सुभाष रोड येथील स्थानिक लोकांनी फोनद्वारे माहिती दिली की, शहरात एका सार्वजनिक ठिकाणी काही मुले एकत्र जमा होवून सिगारेट, बीडी ओढून धुम्रपान करत असतात, त्यामुळे नागरीकांना त्रास होत आहे व याचा परिणाम नागरी वस्तीतील मुलांवर होवू शकतो व महिला, मुली यांचा सदर ठिकाणावरून येणे जाणे असल्याने त्या घाबरत आहेत, त्यावरून दामिनी पथकाने त्या ठिकाणी जाऊन खात्री केली असता, तेथे त्यांना बरेच मुलं सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान करताना मिळून आले. पथकाने त्यांना ताब्यात घेवून त्यांना बीड शहर पोस्टे ला नेवून विचारपुस केली असता, त्यात काही अल्पवयीन मुलांचा समावेश होता. म्हणून त्यांच्या आई-वडिलांना पोस्टेला बोलावून घेतले व सर्व हकीकत सांगितली. अल्पवयीन मुलांना समज देऊन पालकांच्या ताब्यात दिले. व इतर नऊ मुलांवर मुंबई पोलीस अधिनियम अन्वये कारवाई केली. तरी आपापल्या मुलांवर पालकांनी लक्ष द्यावे व तो व्यसनाधीन होणार याची काळजी घ्यावी. सदर कारवाई पीएसआय पल्लवी जाधव, सहायक फौजदार मीरा रेडेकर , पोलीस हवालदार शोभा जाधव व पोलीस शिपाई गजानन चौधरी यांनी केली.

## पान १ वरून...

### १४ लाख एकरवरील

वाचवण्यात प्रशासनाला यश आले असून एकाचा जीव गेला. या पावसामुळे राज्यातील १२ ते १४ लाख एकरवरील शेती बाधित झाली आहे. बाधित क्षेत्रांचा पंचनामा दोन दिवसात करण्याचे आदेश प्रशासनाला देण्यात आले आहेत.

---------

### झेडपीचे २८२ शिक्षक

जागा आहेत या जागा भरण्याबाबत शासनाकडून मार्गदर्शन आल्यास बदली प्रक्रिया होऊ शकणार आहे. संवर्धन १ मधून बदली झाल्यानंतर काही तक्रारी आल्या होत्या तसेच बदली पात्र शिक्षकाकडून आजार व दिव्यांगा बाबत जे जे हॉस्पिटल दिव्यांग समितीच्या प्रमाणपत्राची तसेच जिल्हा शल्य चिकित्सकाचे प्रमाणपत्राची आवश्यकता असताना त्यांची आतापर्यंत पडताळणी झाली नसल्याचे समजते या संवर्गातून दुर्धर आजार नसलेले तसेच धडधाकट शिक्षकांनी बदली केल्याच्या तक्रारी आहे तसेच संवर्ग २ मध्ये ३० किलोमीटर अंतराची अट असताना काही शिक्षकांनी चुकीची माहिती भरत ६० ते ७० किलोमीटर परिसरातून उडी मारली आहे अशा बदल्याबाबत अद्याप चौकशी झालेली नसल्याचे समजते.

---------

### बीडमधील शेतकरी संकटात; केंद्राकडून

मुसळधार पावसाची नोंद झालेली असून जिल्ह्यातील नद्यांना पूर गेलेला आहे. नदीपात्रापासून एक किलोमीटर अंतरापर्यन्त पिके पाण्याखाली आहेत. पावसामुळे पिकांचे, शेतीचे आणि घरांची पडझड होवूनही मोठी हानी झालेली आहे. केज तालुक्यातील काही गावात मांजरा नदीच्या पात्रातील पाणी शिरले होते. या पाण्यामुळे मोठ्या प्रमाणात पिकांचे आणि शेतीचेही नुकसान झाले होते. यानंतर तातडीने खा.बजरंग सोनवणे यांनी पूर्वनियोजीत दौरा रद्द करून शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष शेतात जावून पिकांची आणि नुकसानीची पाहणी केली होती. शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांनी धीर दिला होतायानंतर मुख्यमंत्री आणि कृषीमंत्री यांना निवेदन पाठवून पंचनामे करणे व मदतीची मागणी केली होती. आज दि.१९ रोजी केंद्रीय मंत्री अमित शहा यांची भेट घेवून केंद्र सरकारच्या वतीने तातडीने मदत द्यावी, अशी मागणी केली. दरम्यान, गेल्या ४/५ दिवसांपासून झालेल्या संततधार पावसामुळे बीड जिल्ह्यामध्ये सर्वत्रच शेती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. उपजाऊ मातीसह जमीन वाहून गेल्यामुळे पुढील काळासाठी काही क्षेत्र उजाड झाली आहेत. काही ठिकाणी घरांची पडझड झाली आहे तसेच गुरे दगावले असल्याची माहिती येत आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तात्काळ पंचनामे करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. झालेल्या नुकसानीचे फोटो व व्हिडिओ स्वत:कडे जतन करून ठेवावेत, तसेच नुकसानीबाबतची तक्रार फोटो, व्हीडिओसह तहसीलदार यांच्याकडे लेखी स्वरूपात सादर करावी. या प्रक्रियेत कुठलीही अडचण आल्यास माझ्या कार्यालयाशी संपर्क साधून मदत घ्यावी, असे अवाहनही खा.बजरंग सोनवणे यांनी जिल्ह्यातील शेतकरी व नागरिक यांना केले आहे.

------------

### दीड वर्षापासून अधिकाऱ्याचा जिल्हा

असल्याचे दिसत आहे जिल्हा बँकेच्या प्रशासकीय मंडळाला त्या बँकेच्या आवारात गेल्या दीड वर्षापासून बेकायदेशीर रीतीने मुक्काम ठोकणाऱ्या तालुका उपनिबंधक सहकारी संस्था, बीड यांना रोखता येत नाही,दरम्यान, याबाबत ॲड. देशमुख यांनी महाराष्ट्र शासन, सहकार आयुक्त पुणे, विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था लातूर, जिल्हाधिकारी बीड, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड, तालुका उपनिबंधक सहकारी संस्था बीड आणि मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा बँक, बीड यांच्यासह इतरांना निवेदन दिले आहे.

-----------------

### परळी जवळ कारसह अकरा

पेट्रोलिंग करत असताना गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की एक इसम महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेला गुटखा काळ्या रंगाच्या होंडाई कंपनीची क्रेटा कार मध्ये आहे अशी माहिती मिळाली व सदर ठिकाणी छापा टाकला असता त्याच्या ताब्यातून वेगवेगळ्या कंपनीचा पान मसाला व गुटखा त्याच्या गाडीतून जप्त करण्यात आला असून पोलिस ठाणे परळी ग्रामीण येथे दिनांक दि .१९ / ०८/२०२५ रोजी चे १०/३० वा. दरम्यान गु.र.न.३६७/ २५.कलम१२३,२७४,२७५,२२३, प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला या घटनेत आरोपी फरार झाला असून एकूण किंमत रुपये/- चा मुद्देमाल* ११,३०००० जप्त करण्यात आला आहे. सदरची कामगिर रामचंद गोविंद भताने सचिन आंधळे यांनी पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड स्थानिक गुन्हे शाखा बीड यांच्या आदेशाने पार पडली आहे.

------------

### लाडकीचा लाभ घेणाऱ्या सरकारी

आता अशा ११८३ नोकरदारांवर कारवाई करण्यासाठी शासनाने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांना पत्र पाठवले असून तातडीने कारवाई करुन ग्रामविकास विभाग आणि महिला व बालकल्याण विभागाला कळवण्याचे आदेशित केले आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यात लाडकी बहिण योजनेचा लाभ घेतलेल्या नौकरदारांवर कारवाईला लवकरच हातोडा पडणार असल्याचे दिसते.

-----------

### सोयाबीनचे पावसामुळे मोठे

पालकमंत्री अजित पवार असल्याने शेतकऱ्यांना मदत मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

---------

### अधिकाऱ्यांची मिलीभगत, गौण

पाठीमागे पिंगळे तर गट क्रमांक २५ व २६ च्या बाजूला असलेल्या दहा एकर गायरान क्षेत्रात बेसुमार मुरमाचा उपसा राजकीय वरदहस्त्रामुळे होत आहे याप्रकरणी अशोक अंबादास गलधर यांनी २७ जुलै रोजी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन पोलिसांना निवेदन देऊनही यावर कारवाई करण्यात आलेली नाही विशेषता या ठिकाणी होत असलेला बेसुमार मुरमाचा उपसा पाहता शेजारील शेतकऱ्याला त्याच्या पिकावर परिणाम होत आहे या शेजारी असलेले सेवानिवृत्त पोलीस उपाधीक्षक रंगनाथ यादव गलधर यांनी अडवण्याचा प्रयत्न केला असता त्यांनाही हुंडा कडून धमक्या दिल्या गेल्याचा आरोप अशोक आबासाहेब गलधर यांनी जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांना दिलेल्या निवेदनात नमूद केला आहे

**राजकीय प्रेशर वापरून मुरूम उपसा**

बीड बायपास वरील पिंगळे तरफ गट क्रमांक २५ आणि २६ शेतकरी हॉटेलच्या पाठीमागे होत असलेला अनाधिकृत मुरमाचा उपसा एक राजकीय पक्षाचा पदाधिकारी करत असल्याचा आरोपी होत असून तो आपल्या पदाचा वापर करत कोट्यावधी रुपयाचे गौण खनिज चा महसूल बुडवत असल्याचे अशोक गलधर यांनी तक्रारीत म्हटले आहे.

-----------

### मंत्री पंकजाताई मुंडे यांना कोहिनूर

शुभहस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी लोकमत चे एडिटर इन चीफ राजेंद्र दर्डा उपस्थित होते.

**चर्चासत्रातही सहभाग**

महिलांनी मूल्यसंस्कार, देशाची समृध्द संस्कृती आणि वारसा जपत उद्योग, व्यवसाय आणि अर्थव्यवस्थेत मोलाचे योगदान दिले आहे, या विषयावर परिषदेत एक चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते, यातही ना. पंकजाताई मुंडे यांनी सहभाग घेत आपली सडेतोड भूमिका मांडली पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृह तथा सहकार मंत्री अमित शाह तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या संधीमुळे राज्याच्या विकासात्मक प्रक्रियेत मला योगदान देता येत आहे. आजपर्यंत केलेल्या कार्याचा आणि माझ्या पाठिशी ठामपणे उभे राहणाऱ्या प्रत्येकाचा हा सन्मान आहे, असं ना. पंकजाताई मुंडे यांनी यावर प्रतिक्रिया देताना म्हटलं आहे.

-----------

### तिरुपतीला तब्बल १४०

निर्णय घेतला आहे. आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी या संदर्भात स्वत: माहिती दिली आहे. मुख्यमंत्र्यांनी मंगलागिरीत गरीबी निर्मूलन कार्यक्रमात ही घोषणा केली आहे.

**१२० किलो सोन्याच्या दागिन्यांनी सजवली जाते मूर्ती?**

नायडू यांनी सांगितले की त्याच्या संपत्तीचा हा एक हिस्सा हा भक्त देवाला दान करु इच्छीत आहे. कारण त्याला असे वाटते की ही सर्व भगवान व्यंकटेश्वराच्या कृपेने झालेले आहे. नायडू यांनी हे देखील सांगितले की भगवान व्यंकटेश्वर स्वामीच्या मूर्तीला दर दिवशी १२० किलोच्या सोन्यांच्या दागिन्यांनी सजवले जाते. ही बाब जेव्हा त्या भक्ताला समजली तेव्हा या भक्ताने १२१ किलो सोने दान करण्याचा निर्णय घेतला. या भक्ताने त्याची ओळख गुप्त रहावी अशी विनंती केलेली आहे.

-------------------------

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
बुधवार दि. २० ऑगस्ट २०२५
४

# परभणीत लोअर दुधना प्रकल्पाचा मुख्य कालवा फुटला

## शेतकऱ्यांचं मोठं नुकसान, पंचनामे करुन मदत देण्याची मागणी

परभणीच्या लोअर दुधना प्रकल्पाचा मुख्य कालवा पावसाच्या पाण्याने भरला आणि ओव्हर फ्लो होवून ४ ठिकाणी फुटल्याची घटना घडली आहे. यामुळं शेतकऱ्यांचं मोठं नुकसान झालं आहे. डिग्रस गोकुळवाडी, मांडवा, नंदापूर या गावच्या शिवारात हा प्रकार घडला आहे. यामुळं शेतकऱ्यांच्या शेताला तलावाचे स्वरुप प्राप्त झालं आहे.

दरम्यान, अनेक शेतकऱ्यांच्या पिकांचं नुकसान झालं आहे. नुकसानीचे पंचनामे करुन तात्काळ मदत देण्याची मागणी या शेतकऱ्यांनी केली आहे. तसेच शिवसेनेचे नेते आनंद भरोसे यांनी आज भर पावसात या परिसराची पाहणी केली आहे. लोअर दुधना प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांशी त्यांनी फोनवरुन संवाद साधत कालवा कामात केलेल्या हलगर्जीपणाचा जाब विचारत शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची मागणी केली आहे.

गोकुळाष्टमी आणि दहीहंडीचा मुहूर्त साधत पुन्हा एकदा मुसळधार पावसाने हजेरी लावली असून मुंबईसह राज्यभरात दमदार पाऊस झाल्याचं



दिसून आलं. राज्यातील अनेक ठिकाणी, नद्यांना पूर आला असून नाले, ओढे भरुन वाहू लागले आहेत. त्यामुळे, प्रशासनाकडून सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. राजधानी मुंबईतही आज मध्यरात्रीपासूनच पावसाची धुव्वादार बॅटिंग पाहायला मिळाली. भारतीय हवामान खात्यान विदर्भ, मराठवाडा, कोकणसह, मध्य महाराष्ट्राला पावसाचा इशारा दिला आहे. तसेच, उद्या संपूर्ण कोकणासाठी ऑरेंज अलर्ट असेल, तर पुढील काही दिवस कोकणात काही ठिकाणी अतिमुसळधार ते मुसळधार पावसाची शक्यता आहे, असा अंदाज मुंबई हवामान विभागाने वर्तवला असल्याची माहिती केंद्रप्रमुख शुभांगी भुते यांनी दिली.

गेल्या दोन दिवसांपासून कोसळत असलेल्या दमदार पावसामुळे अनेक नदी-नाले ओसंडून वाहू लागले आहे. तर धरणसाठ्यातही मोठी वाढ झाली आहे. या पावसाचा काही ठिकाणी फायदा झाला आहे. तर काही ठिकाणी मात्र या पावसाने बळीराजाचं मोठं नुकसान केलं आहे. दरम्यान, संभाव्य पावसाचा इशारा लक्ष्यात घेता नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. मुंबईसह कोकणातही दोन दिवस मुसळधार पाऊस कोसळणार असल्याचा अंदाज आहे. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र असून सोबतच, पूर्व पश्चिम ट्रफ तयार झालाय. त्या पार्श्वभूमीवर आज कोकणात जोरदार पावसाची शक्यता आहे.

# बैलपोळ्याची बाजारपेठ सजली

## सर्जा-राजासाठी बाजारात लाखोंची उलाढाल



पुणे : पावसाने दिलेल्या दिलास्यानंतर शेतकरी आता आपल्या लाडक्या सर्जा-राजाच्या साज सजावटीत रमला आहे. बैलपोळा सणाच्या तयारीसाठी सोमवारी राज्यातील अनेक आठवडी बाजारपेठा शेतकऱ्यांनी अक्षरशः फुलवून टाकल्या. बैलांच्या प्रती कृतज्ञतेचा सण म्हणजेच बैलपोळा यंदा २२ ऑगस्ट रोजी साजरा होणार आहे. वर्षभर शेतात कष्ट करणाऱ्या बैलांचा सन्मान करण्यासाठी हा सण महत्त्वाचा मानला जातो.

पावसातही अनेक आठवडी बाजारात शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर साजसामानाची खरेदी केली. झुला, कासरा, नाते, हिंगुळ, बेगड, कवड्या माळ, गोंडे, मोरकी, बाशिंग आदी साहित्याची विक्री झाली. यंदा बैलाच्या साजात सरासरी २० टक्के वाढ झाली आहे. महिलांनी पूजेसाठी मातीचे बैल, नारळ, गेरू, पळसमुळ खरेदी केली. यावर्षी नारळाच्या किमतीही वाढल्या असून, १५० मध्ये ५ नारळ विकले गेले. गतवर्षी ९०० ला मिळणारा झुला यंदा १ हजार २०० ला, तर घागरमाळा १ हजारावर पोहोचल्या आहेत. पितळी तोडे ९५० ते १ हजार १०० किलो, तर घुंगरू हार १५० पर्यंत विकले गेले.

### मातीचे बैल गायब, कृत्रिम बैलांची एन्ट्री

यंदा बाजारातून मातीचे पारंपरिक बैल जवळपास गायब झाले असून, त्यांच्या जागी फायबर व प्लास्टिकचे रंगीबेरंगी बैल आले आहेत. गल्लेबोरगाव येथे मागील वर्षी २० रुपयांना मिळणारा मातीचा बैल यंदा थेट ५० रुपयांवर गेला आहे. तरीही अनेक शेतकरी परंपरागत मातीचे बैल शोधत असल्याचे दिसले.

### शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान

महागाईचे सावट असले तरी पावसाची साथ मिळाल्याने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर उत्साह आणि समाधान दोन्हीही दिसले. पोळा हा सण एकदाच येतो, त्यामुळे सर्जा-राजाला कमी पडू देणार नाही हीच शेतकऱ्यांची भावना प्रत्येक बाजारात जाणवली. यंदाच्या पोळा बाजारपेठा महागाईने भारल्या असल्या, तरी शेतकऱ्यांच्या उत्साहाने आणि परंपरेवरील प्रेमामुळे वातावरण सणासुदीचे झाले होते.

# अनु,जाती- जमातीच्या शेतकऱ्यांसाठी सुवर्णसंधी!

## शेतातील पाईपसाठी सरकारी अनुदान, लगेच करा अर्ज

राज्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील पात्र शेतकऱ्यांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना आणि बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेतून पाईप खरेदीसाठी अनुदान मिळणार असून, हे अनुदान महाडीबीटीच्या माध्यमातून थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केले जाणार आहे. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना प्रत्यक्ष खर्चाच्या १००% किंवा जास्तीत जास्त ₹५०,००० पर्यंत अनुदान मिळेल, मात्र यापैकी जे कमी असेल तेवढेच अनुदान दिले जाईल.

योजनेचे उद्दिष्ट आणि फायदे :या योजनेचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांना सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देणे, उत्पादन वाढवणे आणि शेतीत आर्थिक स्वावलंबन साधणे हा आहे.

पाईप खरेदीवरील आर्थिक मदतीमुळे शेतकऱ्यांचा सिंचन साधनांवरील खर्च कमी होईल, पाण्याचा कार्यक्षम वापर करता येईल आणि शाश्वत शेतीकडे वाटचाल होईल. योग्य नियोजन करून हे अनुदान घेतल्यास शेतात सिंचनाचा दर्जा सुधारेल आणि पिकांची उत्पादनक्षमता वाढेल.

अनुदानाचे दर :शेतकऱ्यांना पाईपसाठी ठराविक दरांनुसार अनुदान दिले जाईल. पीव्हीसी पाईपसाठी प्रतिमीटर ₹७०, एचडीपीई पाईपसाठी प्रतिमीटर ₹१०० आणि एचडीपीई लॅमीनेटेड पाईपसाठी प्रतिमीटर ₹४० इतके अनुदान मिळेल.

पात्रता आणि अटी :योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती प्रवर्गातील असणे आवश्यक आहे. दारिद्र्यरेषेखालील



शेतकऱ्यांना प्रथम प्राधान्य दिले जाईल. साधारणपणे ०.४० ते ६ हेक्टरपर्यंत शेती असणारे शेतकरी पात्र ठरतील. दुर्गम भागातील ०.४० हेक्टरपेक्षा कमी जमीनधारक शेतकरी एकत्र येऊनही अर्ज करू शकतात.

पाईप खरेदीसाठी तालुका कृषी अधिकाऱ्याची पूर्वसंमती घेणे बंधनकारक असून, पूर्वसंमतीनंतर एका महिन्यात खरेदी न केल्यास ती संमती रद्द होईल.

आवश्यक कागदपत्रे :लाभार्थ्यांनी शेतकरी ओळख प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, बँक खाते आधार लिंक, आणि प्रमाणपत्र (दारिद्र्यरेषेखालील असल्यास) सादर करावे लागेल. शेतकरी ओळख क्रमांकामुळे सातबारा, ८-अ उतारा व आधार कार्ड स्वतंत्रपणे द्यायची गरज नाही.


अर्ज प्रक्रिया : सरकारने 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' ही पद्धत लागू केली असल्यामुळे इच्छुक पात्र शेतकऱ्यांनी विलंब न करता अर्ज करावा. अर्जासाठी महाडीबीटी पोर्टलवर लॉगिन करून आवश्यक कागदपत्रांसह ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण करावी.

अधिक माहितीसाठी गावातील कृषी सहाय्यक, कृषी अधिकारी, पंचायत समितीचा कृषी विभाग किंवा जिल्हा परिषद कृषी विभागाशी संपर्क साधावा.

# पौष्टिक चाऱ्यासाठी संकरित नेपिअर

बहुवार्षिक, भरपूर उत्पन्न देणारे संकरित नेपिअर हे फायदेशीर चारा पीक आहे. पाण्याची सोय असल्यास उन्हाळी हंगामासाठी या पिकाची लागवड फेब्रुवारी महिन्यात करावी. या पिकाच्या लागवडीला उत्तम निचरा होणारी जमीन निवडावी. शक्यतो निचरा न होणाऱ्या, दलदलीच्या जमिनी या पिकाच्या लागवडीसाठी टाळाव्यात. योग्य व्यवस्थापन केल्यास या पिकाचे चांगले उत्पादन मिळते.

संकरित नेपिअर या चाऱ्यामध्ये आठ ते नऊ टक्के प्रथिने असतात. या चारा पिकाचे यशवंत आणि फुले जयवंत (आर.बी.एन. - १३) हे सुधारित वाण आहेत. यशवंत वाणाची वैशिष्ट्ये म्हणजे कापणीनंतर जोमाने होणारी वाढ, अधिक लांबलचक भरपूर फुटवे, मऊ, लांब व रुंद पाने आणि त्यावर अल्प प्रमाणात लव ही आहेत. याचबरोबरीने फुले जयवंत हा नवीन सुधारित वाण यशवंत वाणापेक्षा १० ते १५ टक्के जास्त उत्पादन देतो. यामध्ये ऑक्झिलिक आम्लाचे प्रमाण देखील यशवंत गवतापेक्षा कमी आहे, म्हणून हा वाण जनावरांच्या चाऱ्यासाठी फायदेशीर आहे. या पिकाच्या लागवडीला उत्तम निचरा होणारी जमीन निवडावी. शक्यतो निचरा न होणारी, दलदलीच्या जमिनी या पिकाच्या लागवडीसाठी टाळाव्यात. खत व पाणी व्यवस्थापन योग्य प्रमाणात दिल्यास या गवताची चांगली वाढ होते. संकरित नेपिअर गवत बहुवार्षिक व भरपूर उत्पादन देणारे असल्याने



शेत तणविरहित ठेवावे.

लागवडीचे तंत्र : लागवडीपूर्वी उभ्या - आडव्या नांगरटी करून, कुळवाच्या दोन पाळ्या देऊन जमीन भुसभुशीत करावी. शेवटच्या कुळवणीच्या वेळी सात ते आठ टन चांगले कुजलेले शेणखत जमिनीत मिसळावे. खरीप हंगामात जून ते ऑगस्ट आणि उन्हाळ्यात फेब्रुवारी ते मार्च या महिन्यात या गवताची लागवड करावी. याची लागवड ठोंबे मुळासह लावून करावी. तीन महिने वाढू दिलेल्या गवताच्या खोडाच्या जमिनीकडील २/३ भागातील दोन ते तीन डोळे असणाऱ्या कांड्या काढून लावल्यास त्या चांगल्या फुटतात. ठोंबे किंवा कांड्या ९० सें.मी. अंतरावरील सऱ्यांच्या बगलेत लावाव्यात. सरासरी दोन ठोंबांतील अंतर ९० ६० सें.मी. ठेवून लागवड केल्यास आंतरमशागत करणे सुलभ जाते. लागवडीच्या वेळी माती परीक्षणानुसार १०० किलो नत्र, ५० किलो स्फुरद, ५० किलो पालाश द्यावे. त्यानंतर पीकवाढीचा जोम कायम राहण्यासाठी दर चार कापण्यांनंतर २५ किलो नत्र द्यावे. हे बहुवार्षिक बागायती चारा पीक असल्याने तणांचा उपद्रव होतो, त्यामुळे त्याच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होतो. गवताच्या सुरवातीस वाढीच्या काळात एक किंवा दोन खुरपण्या देणे आवश्यक आहे, त्यानंतर गरजेनुसार खुरपणी अथवा खांदणी करावी. गवताच्या भरपूर उत्पादनासाठी पाणी व्यवस्थापनाचा महत्त्वाचा घटक आहे. उन्हाळी हंगामात (फेब्रुवारी ते मार्च) लागवड केल्यास गवताच्या उत्तम वाढीसाठी सुरवातीचे दोन व त्यानंतर आठ ते दहा दिवसांच्या अंतराने पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. पावसाळ्यात (खरीप हंगामात) गरजेनुसार १२ दिवसांच्या अंतराने पाळ्या द्याव्यात, तसेच थंडीच्या दिवसांत १० ते १२ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे.

कापणी व उत्पादन : या गवताची कापणी लागवडीपासून दहा आठवड्यांनी करावी. कापणी जमिनीपासून साधारण १५ ते २० सें.मी. उंचीवर करावी, त्यामुळे फुटवे फुटण्यास चांगली मदत होते. नंतरच्या कापण्या पीकवाढीनुसार सात ते आठ आठवड्यांनी कराव्यात. म्हणजेच सकस, रुचकर, पौष्टिक व रसरशीत चारा उपलब्ध होतो. अशा प्रकारे वर्षभरात सात कापण्या घेता येतात. कापण्या वेळेत करणे आवश्यक आहे, अन्यथा चारा जाड व टणक होऊन पौष्टिकतेचे प्रमाण कमी होऊन, चारा कमी मिळतो. शिफारशीप्रमाणे उत्तम व्यवस्थापन केल्यास प्रति वर्षी आठ ते नऊ कापण्यांद्वारे २५०० ते ३००० क्विंटल चारा एक हेक्टरपासून मिळू शकतो.

# दिन विशेष

## जागतिक दिवस:
## लोकशाही दिन, सद्भावना दिन
## जागतिक डास दिन
## भारतीय अक्षय ऊर्जा दिन

### महत्वाच्या घटना

१६६६ : शिवाजीराजांनी दख्खनेमधे येण्यासाठी 'नरवीर घाटी' हे ठाणे खोटे दस्तऐवज दाखवून ओलांडले.
१८२८ : राजा राम मोहन रॉय यांनी महाराजा द्वारकानाथ टागोर (ठाकूर), कालिनाथ रॉय आणि मथुरानाथ मलिक या तीन मित्रांच्या साहाय्याने कोलकाता यथे ब्राम्हो सभेची स्थापना केली. या सभेलाच पुढे 'ब्राम्हो समाज' म्हणू लागले.
१८९७ : सर रोनाल्ड रॉस यांनी (भारतात) हिवतापाच्या जीवाणूचा शोध लावला. आल्मोडा येथे मलेरियावर केलेल्या संशोधनासाठी त्यांना १९०२ मध्ये नोबेल पुरस्कार देण्यात आला.
१९१४ : पहिले महायुद्ध जर्मन फौजांनी ब्रुसेल्स शहराचा ताबा घेतला.
१९२० : डेट्रॉइट, मिशिगन येथे जगातील पहिले व्यावसायिक नभोवाणी केंद्र ८ (सध्याचे ) सुरू झाले.
१९४१ : दुसरे महायुद्ध फ्रान्समधील भुमिगत चळवळ उखडून काढण्याच्या उद्देशाने जर्मनांनी एका दिवसात ५० हजार नागरिकांना अटक केली. यातल्या ज्यूंना छळ छावण्यात रवाना करण्यात आले.
१९६० : सेनेगलने आपण (मालीपासुन) स्वतंत्र असल्याचे जाहीर केले.
१९८८ : इराण इराक युद्ध सुमारे ८ वर्षांच्या युद्धानंतर युद्धबंदी करार झाला.
२००८ : भारताचा कुस्तीगीर सुशीलकुमार याला बिंजिंग ऑलिंपिकमध्ये ब्राँझ पदक मिळाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७७९ : जेकब बर्झेलिअस स्वीडीश रसायनशास्त्रज्ञ (मृत्यू: ७ ऑगस्ट १८४८)
१८३३ : बेंजामिन हॅरिसन अमेरिकेचे वे३३ राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: १३ मार्च १९०१)
१८९६ : भारतीय फुटबॉल खेळाडू गोस्त पाल यांचा जन्म. (मृत्यू: ८ एप्रिल १९७६)
१९१५ : भारतीय राजकारणी व दक्षिण भारतातील कर्नाटक राज्याचे आठवे मुख्यमंत्री डी. देवराज उर्स यांचा जन्मदिन.
१९१७ : पुरोगामी कवितांचे प्रसिद्ध कवी त्रिलोचन शास्त्री यांचा जन्मदिन.
१९४० : पद्मभूषण व पद्मविभूषण पुरस्कार तसचं, शांततेचा नोबल पुरस्कार विजेते प्रसिद्ध भारतीय हवामान बदलांच्या आंतर-सरकारी पॅनेलचे अध्यक्ष राजेंद्र कुमार पचौरी यांचा जन्मदिन.
१९४१ : स्लोबोदान मिलोसोव्हिच सर्बिया व युगोस्लाव्हियाचे अध्यक्ष (मृत्यू: ११ मार्च २००६)
१९४४ : राजीव गांधी भारताचे ६ वे पंतप्रधान, भारतरत्न (१९९१) मरणोत्तर (मृत्यू: २१ मे १९९१)
१९४६ : एन. आर. नारायण मूर्ती 'इन्फोसिस'चे सहसंस्थापक
१९८६ : अर्जुन पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय बुद्धिबळपटू तानिया सचदेव यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९१४ : ज्ञानपीठ पुरस्कार सन्मानित उडिया भाषेचे प्रसिद्ध साहित्यकार गोपीनाथ महंती यांचा जन्मदिन.
१९३९ : भारतीय इंग्रजी खगोलशास्त्रज्ञ व लेखक एग्नेस गिबर्ने यांचे निधन. (जन्म: १९ नोव्हेंबर १८४५)
१९८४ : रघुवीर भोपळे ऊर्फ 'जादूगार रघुवीर' आंतरराष्ट्रीय कीर्तीचे जादूगार. त्यांनी 'फिरता जादूगार' व 'मी पाहिलेला रशिया' ही पुस्तके लिहिली आहेत. (जन्म: २४ मे १९२४)
१९८५ : अकाली दलाचे अध्यक्ष हरचंदसिंग लोंगोवाल यांची शेरपूर येथे एका गुरूद्वारात गोळ्या घालुन हत्या करण्यात आली. (जन्म: २ जानेवारी १९३२)
१९८८ : माधवराव शिंदे चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व संकलक. 'कन्यादान', 'धर्मकन्या' या त्यांच्या चित्रपटांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाले तर 'शिकलेली बायको' या चित्रपटाला दादासाहेब फाळके पुरस्कार मिळाला. याशिवाय त्यांचे मायेचा पाझर, संसार उर्मिला मातोंडकरचा पहिला चित्रपट हे चित्रपट प्रसिद्ध आहेत. (जन्म:)
१९८८ : चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व संकलक माधवराव शिंदे यांचे निधन.
१९९७ : प्रागजी डोस्सा गुजराथी नाटककार व लेखक, नेहरू पुरस्कार व साहित्य अकादमी पुरस्कार विजेते (जन्म: ७ आक्टोबर १९०७)
२००० : प्राणलाल मेहता चित्रपट निर्माते (किनारा, किताब, बेजुबान, मरते दम तक, पुलिस पब्लिक) (जन्म:)
२००१ : मधुकर रामराव तथा एम. आर. यार्दी प्राच्यविद्येचे गाढे अभ्यासक, केंद्रीय वित्त सचिव, भारतीय विद्या भवनच्या पुणे केंद्राचे अध्यक्ष (जन्म:)
२०११ : भारतीय इतिहासकार आणि शैक्षणिक राम शरण शर्मा यांचे निधन. (जन्म: २६ नोव्हेंबर १९१९)
२०१३ : जयंत साळगावकर ज्योतिर्भास्कर, लेखक व उद्योजक (जन्म: १ फेब्रुवारी १९२९)
२०१३ : अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक, थोर समाजवादी विचारवंत व साधना साप्ताहिकाचे संपादक डॉ. नरेन्द्र दाभोळकर यांची पुणे येथे गोळ्या घालुन हत्या (जन्म:)
२०१४ : भारतीय योग प्रशिक्षक व लेखक तसेच आयंगर योगा चे निर्माते बी. के. अय्यंगार यांचे निधन. (जन्म: १४ नोव्हेंबर १९१८)

# वैभवी देशमुखच्या हस्ते चिंचाळा, राघापूर गावचे ध्वजारोहण

## सरपंचपद माझे नव्हे जनतेचे म्हणून मान जनतेलाच-सरपंच पंडित पोकळे

आष्टी । प्रतिनिधी

स्वातंत्र्यदिनानिमित्त आष्टी तालुक्यातील चिंचाळा राघापूर गावच्या ध्वजारोहणाचे निमंत्रण स्वर्गीय संतोष अण्णा देशमुख यांच्या मुलीला देण्यात आले होते. ही चिंचाळा ग्रामस्थांसाठी अभिमानाची गोष्ट होती. वैभवी संतोष देशमुख हिनं ध्वजारोहणासाठी उपस्थित राहून चिंचाळा गावच्या अभिमानात भर टाकली आहे. खरंच संघर्ष आणि त्यातून मिळालेले यश हे खूप मोठं असतं तेच यश जेव्हा आपल्या गावी येते तेव्हा आनंद गगनात मावत नाही असंच काहीसं चित्र चिंचाळा गावांमध्ये पाहायला मिळालं. वैभवी देशमुख ला ध्वजारोहणाचा मान देऊन सरपंच पंडित पोकळे यांनी केलेलं काम हे गावासाठी अभिमानाचे आहेच पण महाराष्ट्रातील लाखो मराठ्यांसाठी देखील अभिमानाचे ठरले आहे. सरपंच पंडित पोकळे यांनी घेतलेल्या निर्णयाचं सर्व स्तरातून कौतुक केलं जात आहे.

आष्टी तालुक्यातील चिंचाळा राघापूर गावच्या ध्वजारोहणासाठी १३ तारखेला गावातील ज्येष्ठ नागरिक भाऊसाहेब सत्यबापू पोकळे व सिद्धार्थ बाबा पोकळे यांच्या हस्ते तसेच १४ तारखेला ग्रामसेवक निशा जगताप व ग्रामपंचायतचे इतर सहकारी यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले तर १५ ऑगस्ट रोजी स्वर्गीय संतोष अण्णा देशमुख यांच्या मुलीला निमंत्रित करण्यात आले होते. स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वजारोहण वैभवी देशमुख यांच्या हस्ते करून गावातील गुणवंतांचा देखील गुणगौरव कार्यक्रम वैभवी देशमुख व धनंजय भैया देशमुख यांच्या हस्ते आयोजित करण्यात आला होता. विशेष म्हणजे वैभवी देशमुखने परीक्षेमध्ये मिळवलेल्या यशाबद्दलही तिचाही ग्रामस्थांच्या वतीने सन्मान करण्यात आला. त्याचबरोबर राजू सुखदेव पोकळे फौजी, राजू वसंत पोकळे फौजी, वैभव बबन पोकळे तसेच डॉ.शुभांगी सोमीनाथ पोकळे तसेच पडद्यामागचे हिरो म्हणून ग्रामपंचायत चे कर्मचारी कायम उत्कृष्ट काम करणारे लक्ष्मण पोकळे, अविनाश पोकळे व संतोष पोकळे यांचा ही सत्कार मान्यवरांच्या हस्ते झाला. यावेळी गावचे सरपंच पंडित पोकळे, पोलीस पाटील गणपत पोकळे, उपसरपंच ज्ञानेश्वर पोकळे, ग्रा पं सदस्य बाळासाहेब पोकळे, ग्रा पं सदस्य अनिल पोकळे,ग्रा पं सदस्य भाऊसाहेब तांबे,ग्रा पं सदस्य बेबीताई पोकळे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष भाऊसाहेब पोकळे,सेवा सह सो चे व्हा चेअरमन कृष्णा तांबे, माजी सरपंच दिगंबर पोकळे, राधाकिसन पोकळे, जालिंदर पोकळे, डॉ अशोक पोकळे,डॉ सोमनाथ पोकळे, सुखदेव तात्या, राजू पोकळे, अशोक पोकळे, डॉ साळुंके, गणेश पोकळे, सागर पोकळे,शिक्षक शिक्षिका, कर्मचारी,ग्रामस्थ व नागरिक उपस्थित होते कार्यक्रमासाठी आलेल्या सर्व मान्यवरांचे चिंचाळा/राघापूर गावासह परिसरातील नागरिकांचे सरपंच पंडित पोकळे यांनी आभार व्यक्त केले. तसेच देशमुख कुटुंबीयांच्या चालल्या न्याय हक्काच्या लढ्याला चिंचाळा गावचे शेवटपर्यंत सहकार्य व साथ असेल असाही शब्द सरपंच पंडित पोकळे यांनी यावेळी दिला.



स्वर्गीय सरपंच संतोष देशमुख फक्त सरपंच नव्हते ते महाराष्ट्रातील सरपंचाला प्रेरणादायी उदाहरण होते. त्यांनी केलेलं कार्य खूप मोठं होतं ते आमच्यासाठी प्रेरणादायी आहेत. त्यांची झालेले निर्घुण हत्या ही निंदनीय आहेच पण मानव जातीला काळिंबा फासणारी आहे. त्यांच्या पश्चात न्याय हक्कासाठी त्यांच्या मुलीने म्हणजे वैभवी ने केलेला संघर्ष हा खूप मोठा आहे त्यातून मिळालेले यश हे उल्लेखनीय आहे. म्हणूनच वैभवी देशमुखच्या हस्ते हा ध्वजारोहण करण्यात आले व त्यांच्या हस्ते गुणवंतांचा सन्मान करण्यात आला ही आमच्या गावासाठी अभिमानाची बाब आहे. या कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित असलेल्या धनंजय भैया देशमुख आणि वैभवी संतोष देशमुख, सागर धस यांचे आभार मानतो..

–सरपंच पंडित पोकळे

# सोयाबीन पाण्याखाली शेतकरी आर्थिक संकटात

## पंचनामे करून नुकसानभरपाईची लिंबागणेश येथील शेतकऱ्यांची मागणी



लिंबागणेश । प्रतिनिधी

गेल्या ३-४ दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे बीड तालुक्यातील लिंबागणेश पंचक्रोशीतील फुलोऱ्यापासून शेंगा लागण्याच्या अवस्थेत असलेले सोयाबीन, मुग, उडीद आदी पिके पाण्याखाली गेली आहेत. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे पिक वाया जाण्याची भीती आहे. शासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी रामकिसन गिरे, रामचंद्र मुळे, रामदास मुळे, अभिजित गायकवाड, जितेंद्र निर्मळ, बाबु आण्णा वायभट, राजेभाऊ गिरे, श्रीहरी निर्मळ, चिंतामण गिरे, अक्षय वायभट आदींनी केली आहे.

सलग पावसामुळे सोयाबीनमध्ये पाणी साचल्याने मुळांना बुरशी लागली आहे. मुळांना गाठी येऊन वाढ खुंटली असून पिक वाया गेले आहे.शासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी रामकिसन गिरे यांनी केली. दरम्यान, रामचंद्र मुळे यांनी मागील २-३ वर्षांपासून शासन पंचनामे करूनही शेतकऱ्यांना नुकसानभरपाई न मिळाल्याचे सांगितले.बीड जिल्ह्यातील बहुतांश गावांमध्ये अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे पिक पूर्णपणे वाया गेले आहे. शासनाने पंचनाम्याचे आदेश दिले तरी ते प्रत्यक्षात होत नसल्याचे दिसून येते. शेतकरी आर्थिक संकटात सापडले असल्याने शासनाने ओला दुष्काळ जाहीर करून सरसकट नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

## थोडक्यात

### पर्यावरण क्षेत्रात काम करु इच्छिणाऱ्या पात्र व्यक्तींनी अर्ज सादर करावेत

बीड : जिल्हाधिकारी बीड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय येथे दि. १५ जुलै २०२५ रोजी जिल्हा पर्यावरण समिती गठीत करण्याबाबत बैठक घेण्यात आली होती. या बैठकी दरम्यान पर्यावरण मंत्रालय महाराष्ट्र शासन यांच्या १ सप्टेंबर २०१५ च्या आदेशानुसार जिल्हा पर्यावरण समितीमध्ये पर्यावरण क्षेत्रातील २ तज्ज्ञ प्रतिनिधी तसेच पर्यावरण क्षेत्रात काम करणा-या जिल्ह्यातील अशासकीय सेवाभावी संस्थेचे २ प्रतिनिधी नियुक्त करावयाचे आहेत.पर्यावरण क्षेत्रात काम करु इच्छिणा-या पात्र व्यक्तींनी जिल्हाधिकारी बीड या कार्यालयात आवश्यक त्या कागदपत्रासह १५ दिवसाच्या आत अर्ज सादर करावेत, जेणे करुन पात्र व्यक्तींची जिल्हा पर्यावरण समितीमध्ये शासन निर्णयानुसार निवड करुन जिल्हा पर्यावरण समिती गठीत करता येईल, असे उप प्रादेशिक अधिकारी म.प्र. नि. मंडळ जालना तथा समन्वयक बीड जिल्हा पर्यावरण समिती यांनी कळविले आहे.

### हरवलेल्या व्यक्तीबाबत निवेदन

बीड : पोलीस ठाणे श्रीगोंदा,जि. अहिल्यानगर गुरन-२८७/२०२४ कलम ३६३ भादवी प्रमाणे दाखल झालेल्या गुन्हयातील पिडीत अल्पवयीन मुलगी कविता अशोक वामन वय १७ वर्षे ६ महिने रा. गौखेल ता. आष्टी,जि. दि. १४/०३/२०२४ रोजीचे २१.०० ते दि.१५.०३.२०२४ रोजीचे पाहटे ३.०० वाजेच्या दरम्यान श्रीगोंदा कारखाना ता. श्रीगोंदा जि. अहिल्यानगर येथून अज्ञात इसमाने अज्ञात कारणाकरिता पळवून नेले आहे. सदर मुलीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे. नाव सविता अशोक वामन वय १७ वर्षे ६ महिने रा. गौखेल,ता. आष्टी, जि. बीड रंग गोरा,उंची सव्वा पाच फुट, गुलाबी रंगाचा व त्यावर फुले फुले असलेला पंजाबी ड्रेस, पायात काळया रंगाचे सॅडल, उजव्या बाजुच्या गालावर खड्डा. वरील वर्णनाच्या मुलीची माहिती मिळाल्यास किंवा आढळून आल्यास पोलीस ठाणे श्रीगोंदा, पोलीस उपनिरीक्षक पोलीस स्टेशन श्रीगोंदाचे पोलीस उपनिरीक्षक यांच्याशी संपर्क साधावा, असे पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक मनोहर एच खिदळाकर यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे. कोणास सदर मुलगी दिसल्यास कृपया त्वरित मो.क्र.९८८१७३१७२१ यावर संपर्क साधावा:

### ॲड. निलेश हेलोंडे पाटील बीड जिल्हा दौऱ्यावर

बीड : कै. वंसतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड निलेश हेलोंडे पाटील यांचा बीड जिल्हा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. बुधवार दि. २० ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी १२. ०० वाजता छत्रपती संभाजीनगरहून बीडकडे प्रयाण.दुपारी २.०० वाजता विश्राम भवन, बीड येथे आगमन व राखीव. दुपारी ३.०० वाजता तहसीलदार बीड यांनी निश्चित केलेल्या प्रस्तावित चारा लागवडीचे ठिकाणास भेट व पाहणी. दुपारी ४.०० वाजता सोयीनुसार अमरावतीमार्गे काटोलकडे प्रयाण.

### शिवानंद शिवाचार्य महाराज तमलूरकर यांचे प्रवचन

बीड प्रतिनिधी

सर्व भाविक भक्तांना कळविण्यात अतिआनंद होतो की गुरुवार दि.२१ ऑगस्ट २०२५ रोजी शिवानंद शिवाचार्य मठ संस्थान तमलूरचे मठाधीश श्री ष.ब्र.१०८ तपोरत्न सदगुरू शिवानंद शिवाचार्य महास्वामिजी यांचे जीवनात गुरूचे स्थान या विषयावर सविस्तर प्रवचनाचे आयोजित केले आहे. श्री ष.ब्र.१०८ तपोरत्न सदगुरू शिवानंद शिवाचार्य महाराज तमलूरकर यांचे श्री क्षेत्र कपिलधार येथे ४१ व्या अनुष्ठानाची सांगता बुधवार दि.२० ऑगस्ट रोजी झाली आहे. या श्रावण महिन्याच्या पावन पर्व काळानिमित्त गुरुवार दि.२१ ऑगस्ट २०२५ रोजी दत्त संस्थान बालाघाट येथे गुरूचे आपल्या जीवनातील स्थान यावर प्रवचन होणार आहे. श्री गुरूच्या अमृतवाणीचा लाभ घ्यावा असे आवाहन दत्त उपासक वैजिनाथ महाराज शिंदे यांनी केले आहे.

# महात्मा फुले यांची जमीन बिल्डर्सच्या घशात घालू नये- प्रा.लक्ष्मण गुंजाळ

बीड । प्रतिनिधी

महात्मा जोतिराव फुले यांची पुणे स्थित मांजरी (बुद्रुक) येथे सुमारे दोनशे एकर जमीन असून ती भोगवटादार म्हणून सध्या एका संस्थेकडे आहे. ही संस्था बेकायदेशीर ठराव घेऊन बिल्डर्स ला ही जमिन विकण्याच्या तयारीत आहे. तरी शासनाने यात हस्तक्षेप करून सदर बहुमूल्य किमतीची जमीन वाचवावी, असे अ.भा. माळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष प्रा.लक्ष्मण गुंजाळ यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

प्रसिद्धी पत्रकात पुढे म्हटले आहे की,महात्मा फुले यांची मांजरी बुद्रुक येथे दोनशे एकर जमीन आहे.महात्मा फुले यांनी हयात असताना या जमिनीवर शेती उत्पादन घेतले आहे. शेती विषयक अनेक प्रयोग त्यांनी येथे करून शेतकऱ्यांच्या शेती उत्पादनासंबंधी अंधश्रद्धा दूर केल्या होत्या. ग्यानोबा ससाने आणि महादू सदू वापोले यांना बरोबर घेऊन शेत जमीन वहीत केली होती. शेतीमाल उत्पादन आणि विक्री संस्था स्थापन केली होती. आजमितिला या जमिनीची किंमत सुमारे दोन हजार कोटी रुपये एवढी आहे.सद्या ही जमीन सुभाष सामूहिक सहकारी शेती संस्था या संस्थेकडे भोगवटादार म्हणून आहे. ही संस्था बेकायदेशीरपणे ठराव घेऊन बिल्डर्स ला विकण्याच्या तयारीत आहे. हे कृत्य बेकायदेशीर आहे. एक प्रकारे सांस्कृतिक संचितावर डल्ला मारणारे आहे.तरी ही जमीन बिल्डरच्या घशात न जाऊ देता शासनाच्या कल्याणकारी धोरणाप्रमाणे या जमिनीवर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी व्यवसाय कौशल्य विकास केंद्र स्थापन करावे. या जमिनीचे संरक्षण आणि संवर्धन करावे. महापुरुषांच्या नावे असलेल्या या जमिनीचे जतन, संवर्धन करावे आणि विकासाच्या दृष्टीने या जमिनीचा विचार व्हावा. ही जमीन बिल्डरच्या घशात जाता कामा नये, यासाठी शासनाने विक्रीवर आणि खरेदीवर प्रतिबंध करावा, असे शेवटी प्रा. लक्ष्मण गुंजाळ यांनी निवेदनात म्हटले आहे.

# वाईट व्यसनापासून दूर राहून वडिलांचा सन्मान करा-पवार

जालना । प्रतिनिधी

तीर्थपुरी येथील मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालयात महाराष्ट्र शासन अंतर्गत व पोलीस ठाणे तीर्थपुरी आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अमली पदार्थ सेवन विरोधी जनजागृती उपक्रम या कार्यक्रमा प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सहाय्यक पोलीस निरीक्षक वैशाली पवार बोलताना म्हणायला की, विद्यार्थ्यांनी आपले भविष्य चांगले ठेवायचे असेल तर अमली पदार्थ सेवनापासून दूर राहिले पाहिजे, पुढचा काळ फार कठीण आहे.



आयुष्यात आई वडिलांचा सन्मान करणे हे आपले प्रथम कर्तव्य आहे. याची जाणीव ठेवून आपल आयुष्य सुंदर ठेवण्याचा प्रयत्न सातत्याने करावा. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून व्यासपीठावर डॉ .सुनील खांडेभराड यांच्यासह रासेयोचे कार्यक्रमाधिकारी डॉ. अंकुश चव्हाण उपस्थित होते. या कार्यक्रमाची प्रास्ताविक डॉ. प्रबोधन कळंब यांनी केले, महाराष्ट्र शासनांतर्गत अमली पदार्थ सेवन जनजागृती उपक्रम या उपक्रमातून आमली पदार्थाला नाही म्हणा, व आयुष्य हो म्हणा, हे ब्रीदवाक्य समोर ठेवून आपलं चांगलं आयुष्य म्हणजेच आपल्या आई-वडिलांचा सन्मान हे प्रथम कर्तव्य आपले असल्याने, आपण व्यसनापासून दूर राहावे, यामुळे समाजात आपण चांगले आहोत, नाहीतर या समाजात आपली किंमत राहत नाही असे त्यांनी सांगितले . दरम्यान या कार्यक्रमात व्यसनापासून दूर राहण्याची सर्वांना शपथ देण्यात आली, या कार्यक्रमासाठी डॉ जायदा शेख, डॉ.रामलीला पवार, डॉ .प्रदीप जाधव, प्रा. रमेश जोगदंड, प्रा.राहुल कांबळे,डॉ. सुशीलकुमार शिंदे, उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा .योगेश घोगरे, प्रा.अमोल कुक्कडगावकर, प्रा. गाढवे यादव , यांनी परिश्रम घेतले या कार्यक्रमास विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदीप लगड यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ .अंकुश चव्हाण यांनी मानले.

# पाण्यापासून वंचित राहणाऱ्या घरांना पाणीपुरवठा जोडणी पूर्ण

जालना । प्रतिनिधी

अजीम प्रेमजी फाउंडेशन आणि मराठवाडा ग्रामीण विकास संस्था यांच्या संयुक्त सौजन्याने जल संवर्धन व पाणी पुरवठा प्रकल्पांतर्गत मोजे क्रातीनगर (ता. घनसावंगी, जि. जालना) येथे पाण्यापासून वंचित घरांना पाणीपुरवठा जोडणी देण्यासाठी नवीन पाईपलाईन टाकण्याच्या कामाचा शुभारंभ १८ ऑगस्ट रोजी करण्यात आला. उद्घाटन प्रसंगी गावाचे गाव समितीचे अध्यक्ष सुदाम झोपडे अनुप मोरे, शितल पराडे, मंगल बाई झोपडे भीमराव पराडे गंगा दाभाडे गंगुबाई साळवे उसतोड कामगार समिती अध्यक्ष पवार, पाईपलाईनचे कॉन्ट्रॅक्टर तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



या वेळी प्रकल्पाच्या महत्त्वाविषयी माहिती देत पाणीपुरवठा व्यवस्थेत होणाऱ्या सुधारणा आणि त्याचा दीर्घकालीन लाभ यावर भर देण्यात आला. मराठवाडा ग्रामीण विकास संस्था, छ. संभाजीनगर यांच्या वतीने पाण्याचे महत्त्व, त्याचा योग्य वापर आणि पाणी बचत याविषयी ग्रामस्थांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच, ज्या घरांना पाईपलाईन जोडणी हवी आहे.त्या कुटुंबांना आवश्यक प्रशिक्षण देण्यात आले. कार्यक्रमानंतर तात्काळ प्रत्यक्ष पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू करण्यात आले.

या उपक्रमामुळे क्रातीनगर येथील पाणीटंचाईत लक्षणीय घट होऊन प्रत्येक घरापर्यंत स्वच्छ व सुरक्षित पाणी पोहोचेल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला. या प्रकल्पासाठी मार्गदर्शन प्रकल्प संचालक व सचिव अप्पासाहेब उगले सर आणि ओमकार उगले सर यांनी केले. तसेच, प्रकल्प व्यवस्थापक राहुल गाढवे, जिल्हा समन्वयक एकनाथ राउत तांत्रिक पर्यवेक्षक संदीप जाधव, समुदाय संघटक विकास कांबळे, राजेश वाघमारे व गावातील युवक ग्रामस्थ मोठ्या संख्यने उपस्थित होते यांनी परिश्रम घेतले.

# बीड जिल्ह्यात ऑगस्ट महिन्यात ग्रामसभा घ्याव्यात; एकल महिला संघटनेचे निवेदन

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात एकल महिला संघटना ही तळागाळातील पाच हजार महिलांच्या सोबत काम सुरू असून काम करत असताना महिलांच्या समस्या दूर करण्यासाठी शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, महिला संपत्ती अधिकार मुद्यांवर काम करत असताना एकल विधवा, परितक्तता, घटस्फोट झालेल्या,निराधार, वृद्ध महिला, अपंग महिलांचे असंख्य समस्या आहेत आणि त्यांचे मूलभूत गरजा पूर्ण होण्यासाठी महिलांना ग्रामपंचायत च्या योजनांचा लाभ घेता यावा, महिलांचा सक्रिय सहभाग असावा, पूर्वी महिला ग्रामसभा घेणे बंधनकारक केले आहे जेणेकरून महिला स्वतः पुढे येऊन प्रश्न मांढतील फक्त महिलांचा गावाच्या विकास कार्यक्रमात मर्यादित सहभाग राहू नये तर त्यांनी निर्णय प्रक्रियेत पुढे असावे त्यांची क्षमता वाढावी या हेतूने कर्तव्याची खऱ्या अर्थाने जाणीव होणार आहे या साठी महिला सभा अतिशय खूप महत्वाचे आहे

ऑगस्ट मध्ये सर्वसाधारण ग्रामसभेत महिलांचे मूलभूत प्रश्न, शासकीय योजना, रोजगार हमी योजनांचे नियोजनबाबत चर्चा होऊन आराखड्यास मंजुरी संबंधित सभेत ठराव ठेवणाऱ्या विषयावर चर्चा होण्यासबंधी महिला सभा घेण्यात यावी व तसेचे तसेच मुद्दे ग्रामसभेत पारित करून सर्वसाधारण ग्रामसभेत ठरावात नमूद करावे यासाठी एकल महिला संघटना बीड जिल्हा वतीने संबंधित यंत्रणेला तसे पत्र काढावेत यासाठीचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले.

यावेळी एकल महिला संघटनाच्या संजीवनी पखाले, ललिता सावंत, तेजस्विनी उबाळे, शिल्पा पंडित, तारा घोडके, प्रजावती जोगदंड, उर्मिला गालफडे, मंगल कानडे, कौशल्या कळसुले, रुक्मिणी नागापुरे यांच्या निवेदनावर सह्या आहेत

# रोल बॉलच्या संघानी पटकावले तृतीय पारितोषिक

बीड। प्रतिनिधी

उमरगा,जि.धाराशिव येथे १६ ते १७ ऑगस्ट २०२५ रोजी १५ वी मिनी राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धा संपन्न झाली या स्पर्धा महाराष्ट्र राज्य रोल बॉल असोसिएशन व धाराशिव जिल्हा रोल बॉल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आल्या या स्पर्धेमध्ये बीड जिल्ह्यातील संघाने अत्यंत उत्कृष्ट कामगिरी करत मुलांच्या संघाने नवी मुंबई ,पुणे ग्रामीण ,लातूर, धाराशिव , संघांचा पराभव करत कांस्यपदक मिळाले. व मुलीच्या संघाने जळगाव, पुणे संघाचा पराभव करत कास्यपदक मिळाल अकरा वर्षातील मुलांच्या संघामध्ये अथर्व गोरे,स्वराज धनवडे ,आरव आंधळे,श्री चौरे, धीरज डबडे, , निकुंज तोष्णीवाल, राजवीर बांगर, उत्सव मिटकर , मल्हार लाकडे , वेदांत कातखडे , राघव घोडके, मुलींच्या संघामध्ये स्वरा सानप, वेदिका जगताप, अंजिला शेख, संतोषी जाधव, रिया कोलंगडे,आनंदी घोडके, प्रिशा पवार, तनुश्री धांडे, मैथिली भोसले, मैत्रेयी कुलकर्णी, आराध्या नेहरकर खेळाडूंनी अतिशय उत्कृष्ट अशी कामगिरी करत तृतीय पारितोषिक मिळविले या सर्व विजय खेळाडूंना प्रशिक्षक विशाल गिरी, सुधीर हजारे,यांचे मार्गदर्शन लाभले संघ व्यवस्थापक निकिता भोसले,वैभव गिरी यांचे मार्गदर्शन लाभले.या विजय खेळाडूंना जिल्हा क्रीडा अधिकारी, अरविंद विद्यागर, क्रीडा अधिकारी अनिकेत काळे , बीड जिल्हा रोलबॉल असोसिएशनचे सचिव रामदास गिरी, द बा घुमरे शाळेचे संचालक दीपक घुमरे यांनी अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

### टीसी हरवला आहे

जाधव सुशील विनायक या नावाचा डिप्लोमा इलेक्ट्रिकल इंजीनियरिंग द्वितीय वर्ष या वर्षाचा टीसी गेवराई ते माजलगाव प्रवासा दरम्यान हरवला आहे. सापडल्यास खालील मोबाईल नंबरवर संपर्क साधा.

संपर्क
९९२३०८३०७२

# आ.खोतकर,पालिकेचे आयुक्त खांडेकर यांनी नुकसानीची केली पहाणी

जालना । प्रतिनिधी

आमदार अर्जुन खोतकर जालना महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर शिवसेना शहर प्रमुख विष्णू भाऊ पाचफुले यांनी पावसामुळे साचलेल्या गुडघाभर पाण्यातून प्रवास करत पाहणी केली व झालेल्या नुकसानीचा आढावा घेतला. नागरिकांनी आमदार अर्जुन खोतकर यांच्याकडे फोन द्वारे संपर्क साधला असताना आ. अर्जुन खोतकर यांनी कोठारी नगर येथे पाहणीसाठी दाखल झाले आहे. मुसळधार पावसामुळे जालना शहरातील कोठारी नगर भागात गुडघाभर पाणी साचले आहे.



अनेक नागरीकांच्या घरात पाणी घुसले हौते यामुळे तेथील स्थानिक नागरिकांची तारांबळ उडाली व जनजिवन विस्कळीत होऊन नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. घरात पाणी शिरल्याने संसारोपयोगी साहित्याचेही नुकसान झाले आहे. या परिस्थितीची आमदार अर्जुन खोतकर यांनी महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर शिवसेना शहर प्रमुख विष्णू भाऊ पाचफुले यांना सोबत घेऊन पाहणी केली व महापालिकेला त्यांनी तत्काळ उपाययोजना करण्याच्या सूचना केल्या यावेळी या भागातील सर्व पदाधिकारी उपस्थित होती. तसेच आमदार अर्जुन खोतकर आयुक्त खांडेकर शहर प्रमुख पाचफुले यांनी मोंढा परिसरात घेतला आढावा कोठारी नगर भागात मोंढा भागातून येणारे पाणी येत असून मोंढा भागात आमदार अर्जुन खोतकर आयुक्त खांडेकर शिवसेना शहर प्रमुख पाचफुले यांनी आढावा घेतला आहे महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांना पाणी कोठारी नगर कडे येणार पाणी बंद करण्याचे आदेश आमदार अर्जुन खोतकर यांनी महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांना दिले आहे आमदार अर्जुन खोतकर शिवसेना शहर प्रमुख विष्णू पाचफुले यांनी स्वतः उभे राहून काम करून घेतले

# शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलविणारा अवलिया मयांक गांधी

बीड । विशाल साळुंके

हजारो मैला वरून एक माणूस बीड जिल्ह्यात येतो आणि या ठिकाणी शेतकऱ्यांची आर्थिक स्थीती सुधारण्यासाठी प्रयत्न करतो. शेतकऱ्यांच्या कुटुंबाचा अभ्यास करतो. शेतीचा अभ्यास करतो. आणि शेतकऱ्यांच्या शेती नापीक का झाली याचा निष्कर्ष काढून शेतकऱ्यांची आर्थिक शेती सुधारण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन फळबाग शेती वाढवण्यासाठी प्रयत्न करतो. हा माणूस हजारो मैला वरून बीडमध्ये आला. आज सामाजिक कार्यकर्ते मयंक गांधी यांनी पंचवीस एकरावर अत्याधुनिक शेती तंत्रज्ञान केंद्र सुरू केले आहे .त्यांच्या कार्याला सलामच करावा लागेल. साधारणता ७० वर्ष वयाचा असलेला हा तरुण मनाचा माणूस शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करीत आहे. परळी पासून साधारणतः पंचवीस किलोमीटर आणि सिरसाळ्यापासून पाच किलोमीटर पोहनेर रोडवर असलेल्या कृषीकूल संकुलामध्ये मयंक गांधी यांनी शेतकरी प्रशिक्षण केंद्र सुरू केलेले आहे .या ठिकाणी विविध कक्षा द्वारे शेतकऱ्यांना माहिती दिली जाते. शेतमाल मूल्यवर्धन कक्ष ,पाणलोट व्यवस्थापन स्टुडिओ, शेती उपयोगी अवजार ग्रह ई लर्निंग लॅब, मृदा विज्ञान प्रयोगशाळा ,वनस्पती रोग शास्त्र आणि कीटक शास्त्र प्रात्यक्षिक कक्ष, फळबाग लागवड तंत्रज्ञान भाजीपाला लागवड तंत्रज्ञान, मृदा संवर्धन, स्वयंचलित हवामान केंद्र, देवराई ,कंपोस्ट शेड बायोगॅस सयंत्र ,नक्षत्र उद्यान, गोशाळा, रेशीम कीटक संगोपन ग्रह, स्मार्ट सिंचन प्रणाली, शेततलाव , बांबू ऑक्सिजन पार्क, आदी विभाग




तयार करून शेतकऱ्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्याचे काम या ठिकाणी सुरू केले. या कृषीकुलाला मोतीलाल ओसवाल फाउंडेशन कडून मोठी मदत मिळाली. त्यावर कोट्यावधी रुपयाचे संकुल आज उभे आहे. शेतकऱ्यांना निश्चितच याचा फायदा होणार आहे.

या संदर्भात कृषीकुल येथे जाऊन मयंक गांधी यांची भेट घेतली. त्यांनी आपल्या जीवन प्रवासाबद्दल सविस्तर भाष्य केले. यावेळी बोलताना ते म्हणाले की यापूर्वी मी आंतरराष्ट्रीय अर्बन प्लॅनर होतो. भारतातही असे काही करावे याचा विचार करू लागलो .भारतात एवढी गरिबी आहे की मला या ठिकाणीच काम करावेसे वाटले. ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था मजबूत झाली पाहिजे. असा आपला माणस होता मी अण्णा हजारे बरोबर माहितीच्या अधिकारासाठी काम करू लागलो. सिस्टीम सुधारण्यासाठी सत्तेत आले पाहिजे म्हणून अरविंद केजरीवाल यांच्या इंडिया अगेन्स्ट करप्शन या मोहिमेत सहभागी झालो. देशात बऱ्यापैकी जागृती झाली मात्र राजकारण्यांनी आम्हाला मूर्खात काढले. सिस्टीम मध्ये जाण्यासाठीच आम आदमी पार्टी उभी केली. मात्र सरकार आल्यानंतर केजरीवालांनी सत्तेचा मार्ग पकडला. मी राजकारणी नाही असे मला वाटले आणि यापुढे राजकारणात जाणारही नाही कारण राजकारण जवळून पाहिले आहे. देशाची अर्थव्यवस्था बदलायची असेल तर शेतकऱ्यांची अर्थव्यवस्था बदलले पाहिजे. शेती उत्पन्नात सुधारणा झाली पाहिजे. त्यामुळे सर्वात दुष्काळी भाग मराठवाडा आणि त्यातही

पान ३ वर

### ४० किलोमीटर नदी खोलीकरण करणार

यावर्षी जवळपास दोन कोटी झाडे लावण्याचा आमचा मानस आहे. ही झाडे फळांची झाडे असतील याबरोबरच आणखी ३० ते ४० किलोमीटर नदी खोलीकरण करण्याचा आमचा मानस आहे याबरोबरच अल्पभूधारक शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याचाही आमचा माणस असल्याचे मयंक गांधी यांनी सांगितले.

### पाणलोट व्यवस्थापन स्टुडिओ अधिक परिणामकारक

मयंक गांधी यांनी पाणलोट व्यवस्थापन स्टुडिओ तयार केलेला आहे. जलसंवर्धन तंत्र विकसित करण्यासाठी हा स्टुडिओ तयार केला. शेतकऱ्यांना अभ्यास करण्यासाठी याचा उपयोग होईल प्रत्येक मॉडेल पाणी टिकून ठेवण्यासाठी मृदा संवर्धनामध्ये आणि भुजल पुनर्भरणात सहरचनांची महत्त्वाची भूमिका स्पष्ट करते. नदीचे खोलीकरण केल्यानंतर या नदीमध्ये बोर घेऊन हे पाणी ३०० फूट खाली सोडून त्याचा साठा करण्याचे नवीन तंत्रज्ञान आणून किमान सहा महिने तरी हे पाणी या ठिकाणी जमा झाले पाहिजे तरच पाणी पातळी वाढेल असेही मयंक गांधी यांनी स्पष्ट केले.

### राजकारणावर विश्वास नाही

देशाची आर्थिक शेती सुधारावी म्हणून आम आदमी पार्टीमध्ये सहभागी झालो मात्र नंतर हा पक्षही राजकारणाकडे झुकत असल्याचे दिसल्याने पार्टी सोडली आणि सरळ शेतकऱ्यांसाठी काम सुरू केले शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले पूर्वी शेतकऱ्यांचे उत्पन्न हे वार्षिक ३७०० होते आता ते ३००० आता ते ३८ हजारापर्यंत गेले आहे दिवसेंदिवस शेतकऱ्यांच्या कामांमध्ये प्रगती दिसत आहे .

### सर्वांना सोबत घेऊन काम

मराठवाड्यामध्ये जे जे लोक शेती उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करतात त्या सर्वांना सोबत घेऊन काम करायचे आहे विजय आण्णा बोराडे यांनी जालना जिल्ह्यात पाणलोटचे मोठे काम केले आहे .त्यांचीही आम्हाला मदत होत असल्याचे मायांक गांधी यांनी सांगितले.

## चेक बाउन्स प्रकरणी पोलिसाला सहा महिने शिक्षा-ॲड. तेजस नेहरकर

बीड । प्रतिनिधी

फिर्यादी दामोदर रावसाहेब साळुंके रा. बीड यांचे कडून आरोपी किशोर दामोदर डोके रा. बीड पोलीस कॉन्स्टेबल नेमणूक आष्टी पोलीस स्टेशन याने घरगुती अडचण सांगून फिर्यादीकडे तीन लाख रुपये हात उसने देण्याची मागणी केली होती. फिर्यादीने त्याच्यावर विश्वास ठेवून कुठलाही कागदोपत्री पुरावा न बनवता आरोपीला नगदी रोख तीन लाख रुपये दिले होते .याला कोणीही साक्षीदार नव्हते. आरोपीने दिलेला स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा बीड चा



चेक फिर्यादीने बँकेमध्ये वटवण्यासाठी टाकला असता आरोपीचे खात्यावर पैसे नाहीत म्हणून तो चेक वापस आला. त्यानंतर फिर्यादीने आरोपीस पैशाची मागणी केली असता आरोपीने पैसे देण्यास नकार दिला. उपरोक्त प्रकरण एडवोकेट तेजस नेहरकर यांच्यामार्फत मा. मुख्य न्याय दंडाधिकारी बीड यांच्या न्यायालयात एन आय ॲक्ट कायद्या नुसार दाखल करण्यात आले त्याचा क्रमांक. एस एस सी. १०२४ / २०२४ असा असून सदरचे प्रकरण साक्षी पुराव्या साठी दोन वर्ष अकरा महीने चालले. एडवोकेट

पान ३ वर

## दत्त संस्थान बालाघाट येथे शिवानंद शिवाचार्य महाराज यांचे प्रवचन

बीड । प्रतिनिधी



गुरुवार दि.२१ ऑगस्ट २०२५ रोजी शिवानंद शिवाचार्य मठ संस्थान तमलूरचे मठाधीश श्री ष.ब्र.१०८ तपोरत्न सदगुरू शिवानंद शिवाचार्य महास्वामिजी यांचे जीवनात गुरूचे स्थान या विषयावर सविस्तर प्रवचनाचे आयोजित केले आहे.

श्री ष.ब्र.१०८ तपोरत्न सदगुरू शिवानंद शिवाचार्य महाराज तमलूरकर यांचे श्री क्षेत्र कपिलधार येथे ४१ व्या अनुष्ठानाची सांगता बुधवार दि.२० ऑगस्ट रोजी झाली आहे. या श्रावण महिन्याच्या पावन पर्व काळानिमित्त गुरुवार दि.२१ ऑगस्ट २०२५ रोजी दत्त संस्थान बालाघाट येथेगुरूचे आपल्या जीवनाततील स्थान यावर प्रवचन होणार आहे. श्री गुरूच्या अमृतवाणीचा लाभ घ्यावा असे आवाहन दत्त उपासक वैजिनाथ महाराज शिंदे यांनी केले आहे.

## अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांचे सरसकट तात्काळ पंचनामे करून हेक्टरी एक लाख रुपयांची मदत द्यावी -अशोक डक

माजलगाव । प्रतिनिधी

गेल्या तीन-चार दिवसांपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे माजलगाव तालुक्यातील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे.या अतिवृष्टीमुळे केवळ शेतीच नव्हे तर रस्ते, नदी-नाल्यालगतची जमीनही मोठ्या प्रमाणावर वाहून गेली आहे. या पार्श्वभूमीवर मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती अशोक डक यांनी शासनाने तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये मदत द्यावी अशी मागणी केली आहे.



१३ ऑगस्टपासून सलग पडणाऱ्या पावसामुळे तालुक्यासह जिल्ह्यातील १७ महसुलमंडळात अतिवृष्टी झाली. परिणामी शेतकऱ्यांच्या हातात आलेले सोयाबीन, कापूस, तूर, बाजरी ही पिके पाण्याखाली गेली असून मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. नदी-नाल्यालगत असणाऱ्या शेतजमिनी खरडून गेल्या आहेत. याशिवाय गावांना शहराशी जोडणारे रस्ते तसेच शेतात जाणारे पायवाटेचे रस्ते वाहून गेल्याने शेतकऱ्यांचे हाल झाले आहेत. त्यामुळे शासनाने तातडीने या रस्त्यांची दुरुस्ती करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, तसेच अतिवृष्टीग्रस्त सर्व शेतकऱ्यांचे सरसकट पंचनामे करून हेक्टरी एक लाख रुपये आर्थिक मदत द्यावी अशी मागणी अशोक डक यांनी केली आहे.

## चोरीचे वाहन पकडून जिल्हा वाहतुक शाखेचा वाहन चोरीला लगाम

बीड । प्रतिनिधी

जिल्हा वाहतुक शाखेचे प्रभारी सुभाष सानप व पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांनी व त्यांच्या टीमने गेल्या महिनाभरात जिल्हाभरात बीड, परळी, गेवराई, नेकनूर येथे अवैध वाहतुक करणार्यांवर चांगलाच दणका दिला होता तसेच बीड नगर परिषदेला देखील संयुक्त कार्यवाहीमध्ये सहकार्य करुन शहरातील अवैध अतिक्रमण हटवले होते ज्यामुळे रस्त्यांना मोकळा श्वास घेता आला असे असतांनाच आज दि.१९ मंगळवार रोजी सुभाष रोडवरील जिल्हा वाहतुक शाखेच्या कार्यालयासमोर ४ वाजण्याच्या सुमारास मोटार वाहन केसेस चालू असतांना मोटार सायकल चालक पकडला गेला व तो



विचारपुस करण्याच्या दरम्यान ततऽऽ पपऽऽ ची भाषा बोलत उत्तरे देणं टाळू लागला यावेळी पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांच्या व सहकार्यांच्या हा प्रकार चोरीचा असल्याचे लक्षात येताच सदरील वाहनधारकास शिताफीने पकडून त्यांनी वाहन ताब्यात घेतले. दि.१९ ऑगस्ट २०२५ मंगळवार रोजी पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर व सहकारी पो.ह.विष्णु काकडे, पोलीस अंमलदार वसीम शेख, चिंतामण शिंदे, चालक संतोष हरके, नारायण वाघमारे, पोलीस हवालदार राजाभाऊ तांदळे यांनी सुभाष रोडवरील वाहतुक शाखेच्या कार्यालयासमोर कार्यवाही चालू असतांना मोटारसायकल चालक नामे प्रशांत मंगेश देवतवाल (२० वर्षे) रा.विरशैव कॉलनी, पेठ बीड ता.जि.बीड हा होंडा कंपनीचे वाहन क्रमांक एम.एच.२२ ई ७०७६ चालवत असतांना त्यास दंडात्मक कार्यवाहीसाठी ताब्यात घेतले व चौकशी करत असतांना तो उडवा-उडवीची उत्तरे देवू लागला सदर प्रकार हा पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांच्या लक्षात येताच त्यांनी डिव्हाईसवर सदरील वाहनासंबंधी माहिती पाहिली असता सदर वाहन २०२२ मध्ये परभणी जिल्हा नांनलपेठ पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.०२२९/२२ कलम ३७९ भादवि प्रमाणे गुन्हा दाखल असल्याचे आढळून आले. यावेळी पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांनी व त्यांच्या सहकार्यांनी वाहनचालक व वाहन पुढील कार्यवाहीस्तव पोलीस स्टेशन बीड शहर येथे जमा केले.

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची दिल्लीत भेट

### आ.सुरेश धस यांनी रस्ते विकास कामाबाबत केली चर्चा

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनी नुकतेच नवी दिल्ली येथे केंद्रीय रस्ते विकास व परिवहन मंत्री मा. नितीन गडकरी यांची भेट घेऊन मतदारसंघातील राष्ट्रीय महामार्गांच्या अपूर्ण कामांबाबत सविस्तर चर्चा केली.

या भेटीत आ. धस यांनी पालखी मार्गासह विविध महामार्गावरील प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी ठोस मागण्या मांडल्या. राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५२ (पैठण-पंढरपूर) अंतर्गत शिरूर (का.) ते खर्डा या टप्प्यातील घोगस पारगाव, माळेगाव (च.), उकिर्डा (च.), दहिवंडी, शिरूर (का.), राक्षसभुवन तसेच पाटोदा तालुक्यातील कारेगाव, चुंबळी, पाटोदा, पारगाव घु., अनपटवाडी या गावांमध्ये रस्त्याचे



काम अपूर्ण आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

भूसंपादनाच्या प्रलंबित प्रकरणांसाठी मावेजा मिळवणे आणि मंजूर निधी वाढवून उपलब्ध करून देणे अत्यंत आवश्यक असल्याचे धस यांनी मांडले. २०१४ साली मंजूर झालेल्या पालखी मार्गाच्या कामात अद्याप मोठा विलंब झाला असून, त्वरित तोडगा काढावा, अशी मागणी त्यांनी केली. यासोबतच राष्ट्रीय महामार्ग क्र. ५६१ (अहिल्यानगर-धानोरा-कडा-आष्टी-जामखेड-बीड) या मार्गावरील अपूर्ण टप्पे आणि पूल कामांवरही चर्चा झाली. आष्टी ते चिंचपूर आणि अहिल्यानगर ते साबलखेड या मार्गावरील पुलांना पूल-कम-बंधारा स्वरूप देण्याची मागणी त्यांनी केंद्रीय मंत्री यांच्याकडे केली. आष्टी तालुक्यातील वाघळूज, कडा, शेरी (बु.), जळगाव, कासारी, आष्टी, पांढरी, चिंचपूर या गावांमध्ये पूल-कम बंधारे बांधल्यास मोठ्या प्रमाणावर पाणी अडवता येईल आणि परिसरातील शेतीसाठी सिंचनाची सुविधा वाढेल, असेही धस यांनी स्पष्ट केले.

## शिवदास थळकरी यांची राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या केज तालुकाध्यक्षपदी निवड




युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील युवानेते तथा रमेशराव आडसकर यांचे कट्टर समर्थक शिवदास थळकरी यांची नुकतीच राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या केज तालुकाध्यक्ष पदी निवड झाली असुन कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या युवक आघाडीच्या संघटनात्मक बांधणीस गती देण्यासाठी नुकतीच केज तालुक्यात नवीन पदनियुक्ती करण्यात आली असुन यामध्ये युसूफवडगांव येथील शिवदास थळकरी यांचनी पक्षाच्या विचारधारे प्रतीनिष्ठा ठेऊन त्यांनी सामाजिक व राजकीय क्षेत्रात काम केले आहे.या सोबतच त्यांनी युवकांना राजकारण व समाजकारणत सहभागी करून घेण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन पक्षश्रेष्ठींनी त्यांची राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या केज तालुका अध्यक्ष पदी निवड

पान ३ वर

## अंबड व परतूरमध्ये २११ जणांविरुद्ध प्रतिबंध कारवाई



जालना । प्रतिनिधी

२७ अगस्ट पासुन गणेशोत्सव हा हिंदु बांधवांचा सण मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात येणार आहे. तसेच दिनांक ०५.०९.२०२५ रोजी ईद ए मिलाद हा मुस्लीम बांधवांचा एक महत्वाचा धार्मिक सण साजरा करण्यात येणार आहे.

त्या अनुषंगाने मा.श्री. अजय कुमार बंसल पोलीस अधीक्षक यांनी दिलेल्या सुचना व आदेशा प्रमाणे मा.श्री. आयुष नोपाणी अपर पोलीस अधीक्षक यांनी उपविभाग अंबड येथे विशेष प्रतिबंधक कारवाई मोहिमीचे आयोजन करण्यात आले होते. ज्यामध्ये पोलीस ठाणे अंबड येथे २२, पोलीस ठाणे घनसावंगी ११, पोलीस ठाणे गोंदी ४६, पोलीस ठाणे तिर्थपुरी ०७ अशा विविध गुन्हयातील एकुण ८६ आरोपीतांवर प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली आहे.

## तर सीईओच्या दालनात शाळा भरवणार-जिल्हाप्रमुख गणेश वरेकर

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील सौंदाना येथील जि.प. शाळेची अवस्था अत्यंत दयनीय झालेली आहे, सर्वत्र पडझड झालेली असुन, पावसाळ्यात हया खोल्या गळत असुन विध्यार्थ्यांनच्या जिविताला धोका निर्माण झाला आहे शासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा करून दोन खोल्या दोन वर्षांपूर्वीच मंजूर करून घेतल्या मात्र संबंधित ठेकेदाराने कामच चालू न केल्यामुळे शाळेची अवस्था जास्तच खराब झाली आहे आज सौंदाना येथील रहिवासी व शिवसेना जिल्हा सहसचिव श्रीकृष्ण गायके व गावकरी यांनी शिवसेना जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांची जिल्हा मध्यवर्ती कार्यालयात येऊन भेट घेतली असता सर्व गावकऱ्यांना सोबत घेऊन



जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर व तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांच्या प्रमुख उपस्थितीत जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान यांची भेट घेऊन निवेदन दिले व येत्या सात दिवसांत काम चालू न केल्यास आपल्या दालनात शाळा भरविण्यात येईल असा इशारा जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांनी दिला आहे.यावेळी जिल्हा सहसचिव श्रीकृष्ण गायके ,उपतालुकाप्रमुख महादेव परसकर,बाबु कुटे, रत्नाकर येवले,विशाल गायके , सुरेश सावंत, सतिश गायके ,गोकुळ गायके यांच्यासह सौंदाना येथील गावकरी व शिवसैनिक उपस्थित होते.

## अतिवृष्टीग्रस्त भागात पंचनामे करून नुकसान भरपाईची मागणी

परळी । प्रतिनिधी

तालुक्यात दि १७, १८ रोजी नागापूर, मोहा, सिरसाळा, पिंपळगाव गाडे या महसूल मंडळ व गावात अतिवृष्टीची नोंद झाली असून शेकडो हेक्टरवरील पीक पाण्याखाली गेली आहेत. शेतपिकांचे मोठे नुकसान झाले असून या महसूल मंडळात व गावात झालेल्या पिकांच्या नुकसानाचे पंचनामे करून तात्काळ शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी किसान सभेकडून करण्यात आली असून या बाबतचे निवेदन तहसील कार्यालय व तालुका कृषी



किसान सभेचे महसूल व कृषी विभागाला निवेदन

कार्यालयात देण्यात आले आहे.

परळी शहर व तालुक्यात दि १५ ऑगस्ट पासून सूर्यदर्शन न घडता सातत्याने पावसाने जोर पकडला आहे. खरीप हंगामातील जून व जुलै हे दोन महिने कोरडे गेले असल्यामुळे पेरणीत विस्कळीतपणा व पीक परिस्थिती ही समाधानकारक नव्हती. अशा विदारक परिस्थितीत मागील चार-पाच दिवसापासून लागून राहिलेल्या पावसामुळे जागोजाग शेतात पाणी साचले आहे. पिके पाण्याखाली जाऊन पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. दि १७ व १८ ऑगस्ट रोजी सिरसाळा महसूल मंडळात १२२.३, गाडे पिंपळगाव महसूल मंडळात १२५.५, नागपूर महसूल मंडळात ९२.५ व मोहा महसूल मंडळात अश्याच प्रमाणात अतिवृष्टी झालेली आहे. तालुक्यातील अनेक लघु व मध्यम सिंचन तलाव ओसंतडून वाहू लागले आहेत.

पान ३ वर

## रमेश आडसकर यांनी अतिवृष्टीने नुकसान झालेल्या पिकांची केली पहाणी

केज । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे जेष्ठ नेते, रमेश आडसकर यांनी केज तालुक्यात अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त झालेल्या पिकांची पहाणी करून संबंधित अधिकारी यांच्याशी दुरध्वनीवरून संपर्क साधून जलद गतीने शेतीचे पंचनामे करून शासनाकडे अहवाल सादर कराव्या अशी मागणी केली आहे.

मागील काही दिवसांपासून केज तालुक्यात संततधार पावसाने हजेरी लावली आहे. त्यामुळे शेतात तळ्यांचे स्वरूप आले आहे. पिकांचे नुकसान झाले आहे. शेतकरी हतबल झाले आहेत. रा. कॉ. पक्षाचे ज्येष्ठ नेते रमेशराव आडसकर यांनी केज



तालुक्यातील बोरगाव, भोपला, दहीटना सह अनेक गावात दौरा करत पायी शेतकर्यांच्या शेतात जाऊन प्रत्यक्ष माहिती घेऊन संबंधित अधिकारी यांच्याशी दुरध्वनीवरून संपर्क साधून शासनाकडे अहवाल लवकर पाटवा अशी विनंती करून आपण स्वतः उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्याशी भेटून जिल्ह्यातील नुकसानग्रस्त शेतकरी बांधवांना तातडीने मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार आहे असे यावेळी सांगितले आहे. रमेशराव आडसकर यांच्यासोबत अंकुशराव इंगळे, ऋषीकेश भैय्या आडसकर, अमर भैय्या पाटील, दिलीप गुळभिले तसेच अनेक गावचे सरपंच, नेते, कार्यकर्ते व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# विद्यापीठ चौकातील वाहतूक कोंडी सुटणार

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते दुमजली उड्डाणपुलाचे बुधवारी लोकार्पण

पिंपरी । प्रतिनिधी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौकातील दुमजली उड्डाणपुलाचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते बुधवारी (दि.२०) सायंकाळी होणार आहे. या भागातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी पर्यायी व्यवस्था म्हणून या उड्डाणपुलाची उभारणी करण्यात आली असून, बुधवारी लोकार्पण झाल्यानंतर रहदारीसाठी हा उड्डाणपुल खुला करण्यात येईल. परिणामी वाहनधारकांसह नागरिकांना या भागातून प्रवास करणे सुकर होणार असल्याची माहिती पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी दिली.

पुणे विद्यापीठ चौकामध्ये तसेच गणेशखिंड रस्त्यावरील वाहतूक कोंडीच्या निराकरणासह दिर्घकालीन वाहतूक व्यवस्थापन सुनिश्चित करण्यासाठी या एकात्मिक दुमजली उड्डाणपुलाची उभारणी करण्यात आली असून यासाठी अंदाजित





२७७ कोटीच्या अंदाजपत्रकास मान्यता प्राप्त आहे. या भागातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी तसेच अस्तित्वातील वाहतुकीस पुरेसा रस्ता उपलब्ध व्हावा म्हणून गणेशखिंड रस्त्याचे पुणे विद्यापीठ ते भारतीय कृषी महाविद्यालय या लांबीमध्ये पुणे मनपा विकास आराखड्यानुसार ४५ मी. पर्यंत रस्ता रुंदीकरण करण्यात आले आहे.


बुधवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण झाल्यानंतर या उड्डाणपुलाची एक मार्गिका (औंध - शिवाजीनगर) वाहतुकीसाठी खुली करण्यात येणार आहे. शिवाजीनगर व औंध बाजूकडील रॅम्पचे बांधकाम पूर्ण झाले असून उर्वरित बाणेर व पाषाण बाजूकडील रॅम्पचे बांधकाम ऑक्टोबर २०२५ अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन पीएमआरडीएच्या माध्यमातून करण्यात येत असल्याचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी सांगितले.

या उड्डाणपुलाच्या आराखड्यास प्राधिकरण सभा, कार्यकारी समिती, पुणे महानगरपालिका व पुणे एकीकृत महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांची मान्यता मिळाल्यानंतर प्रत्यक्ष बांधकामास ऑगस्ट २०२२ पासून प्रारंभ करण्यात आला होता. या कामासाठी शासनाने २६/०५/२०२० रोजीच्या पत्रान्वये मेट्रो सवलतकार कंपनी व पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे दरम्यान स्वाक्षांकित करावयाच्या पूरक सवलत करारनामाच्या मसुद्यास मान्यता दिली होती. तत्पूर्वी, अस्तित्वातील दोन एकेरी वाहतुकीचे उड्डाणपूल ऑगस्ट २०२० मध्ये शासनाच्या मान्यतेने पाडण्यात आले होते. यानंतर संबंधित उड्डाणपुलाचे काम सुरु केले होते. मुख्य विद्यापीठ चौकामध्ये वाहतूक व्यवस्था सुरळीत राहावी, यासाठी ५५ मी. लांब स्टील गर्डर बसवण्यात आला आहे.

# वडगाव नगरपंचायतीच्या प्रारूप प्रभाग रचनेचा आराखडा प्रसिद्ध; हरकती नोंदविण्याचे मुख्याधिकाऱ्यांच्या आवाहन

वडगाव मावळ । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाच्या आदेशान्वये नगरपरिषद / नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२५ करता वडगाव नगरपंचायतीच्या प्रारूप प्रभाग रचनेचा आराखडा तयार करण्यात आला आहे. तसेच प्रभाग संख्या निश्चित करून आराखडा विभागीय आयुक्त कार्यालयाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला आहे. येत्या २१ ऑगस्टपर्यंत हरकती-सूचना नोंदविता येतील अशी माहिती वडगाव नगरपंचायतीचे मुख्याधिकारी तथा प्रशासक प्रवीण निकम यांनी दिली आहे.



वडगाव नगरपंचायतीचे मुख्याधिकारी डॉ. निकम यांनी शासनाच्या आदेशानुसार प्रारूप प्रभागरचना तयार करून जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवडणूक आयोगाकडे मंजुरीसाठी पाठवला होता. निवडणूक आयोगाने मान्यता दिल्यानंतर आज प्रारूप प्रभाग रचनेची प्रसिद्धी करण्यात आली असून, हरकती व सूचना असल्यास दाखल कराव्यात,असे आवाहन करण्यात आले आहे.

प्रभाग रचनेच्या वेळापत्रकानुसार दि १८ ते २१ ऑगस्ट २०२५ या कालावधीत प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध करण्यात येत आहे. सदर प्रभाग रचना नोटीस व नकाशा कार्यालयीन वेळेत नगरपंचायतच्या नोटीस बोर्डवर उपलब्ध असेल, तसेच नगरपंचायतच्या वेबसाईटवर उपलब्ध असेल. त्यावर नागरिकांनी आपल्या हरकती व सूचना नोंदवाव्यात. इच्छुक नागरिकांनी आपली हरकती / सूचना नगरपंचायत कार्यालयातील आवक-जावक विभागामध्ये लेखी स्वरूपात सादर कराव्यात. हरकती व सूचना सादर केलेल्या नागरिकांना स्वतंत्रपणे सुनावणीसाठी कळविण्यात येईल. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा व सूचनांचा विचार केला जाणार नाही अशी माहिती वडगाव नगरपंचायत प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

वडगाव नगरपंचायत हद्दीत पूर्वीप्रमाणेच १७ प्रभाग असून, रचनेमध्येही फारसा बदल झालेला दिसत नाही. तसेच प्रभागांची व सदस्यांची संख्याही १७असल्याचे यामुळे निश्चित झाले आहे. हरकती व सूचना दाखल करण्याची मुदत संपल्यानंतर २२ ऑगस्ट ते १ सप्टेंबर या कालावधीत दाखल झालेल्या हरकती व सूचनांवर सुनावणी होणार असून, त्यानंतर पुन्हा जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवडणूक आयोगाची परवानगी मिळाल्यावर अंतिम प्रभाग रचना २६ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

# पिंपरी चिंचवडमध्ये वैष्णवी हगवणे प्रकरणाची पुनरावृत्ती?

पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी

संपूर्ण राज्यभर गाजलेल्या पुणे येथील वैष्णवी हगवणे प्रकरणाची पुनरावृत्ती पुन्हा एकदा पिंपरी चिंचवड शहरांमध्ये घडल्याचे दिसत आहे सासरच्या मंडळींनी या विवाहितेचा खून केला असून तिला न्याय मिळावा अशी मागणी मयत विवाहितेच्या भावाने केली आहे



शहरामध्ये वैष्णवी हगवणे त्या प्रकरण काही दिवस उलटून गेले असता त्याचीच पुनरावृत्ती पिंपरी चिंचवड शहरातील

वाकड पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये ५७ फ्लॅट नंबर इ ९०१ जिंजर हॉटेल डेक्कन तलवार स्पोर्ट शोरूम शेजारी भुमकर चौक वाकड या ठिकाणी मयत दिव्या सूर्यवंशी पती हर्षल शांताराम सूर्यवंशी शांताराम उत्तम सूर्यवंशी सासू. वरील दिलेल्या पत्त्यावर मृत मुलीसह राहत होते काल दुपारी दोनच्या सुमारास दिव्या सूर्यवंशी हिने गळफास लावून आत्महत्या केल्याची बातमी सर्वत्र पसरली असता दिव्या सूर्यवंशी च्या माहेरच्या लोकांनी तिच्या पतीवर हर्षल सूर्यवंशी नामक असतो पतीने गळफास देऊन मारल्याचा आरोप दैनिक राज्य लोकतंत्र प्रतिनिधीशी बोलताना सांगितले घटना घडल्याचे माहेरच्या लोकांना समजली व वैष्णवी हगवणे प्रकरणाची पुनरावृत्ती परत घडल्याच दिसून आले वाकड पोलीस ठाणे येथे कुटुंबाने संवाद साधून घडलेला सर्व प्रकार सांगितला जोपर्यंत आमच्या मुलीचा खून केलेल्या गुन्हेगारांना अटक होत नाही तोपर्यंत आम्ही आमच्या मुलीची बॉडी ताब्यात घेणार नसल्याचे कुटुंबांनी सांगितले मयत दिव्या सूर्यवंशी च्या भावाच्या पत्नीने प्रशासनावरती आरोप केला लाडकी बहीण महाराष्ट्रामध्ये सुरक्षित नसल्याचे तिने सांगितले जर बहिण सुरक्षित नसेल तर या प्रशासनाचा लाडकी बहीण ओवाळणी देऊन काय उपयोग आमची दिव्या जवळपास तीन वर्षापासून पतीचा त्रास सहन करत असल्याचे आईने व भावजयीने भावाने सांगितले सोन्याची मागणी केली होती भांडे घरातील फर्निचर करण्यासाठी पैशाची ही मागणी केली होती आम्ही ते आमच्या मुलीला त्रास होऊ नये म्हणून देत गेलो पण हर्षल सूर्यवंशी यांनी आमचा घात केला असल्याचे सांगितले वाकड पोलीस स्टेशनची दैनिक राज्य लोकतंत्र नी संवाद साधला असता वरिष्ठ अधिकारी माळी साहेब यांनी गुन्हा दाखल झाल्यानंतर आम्ही आपल्याला माहिती देऊ असे सांगितले या प्रकरणांमध्ये पोलीस प्रशासन काय कारवाई करतात याकडे लक्ष लागून आहे

# पावसाने पुणेकरांची दैना! सिंहगड रस्ता झाला जाम; वाहनांच्या लांबच लांब रांगा

पुणे । प्रतिनिधी

**पुणे शहरात पावसाची संततधार अजूनही कायम आहे. पावसामुळे शहरातील जनजीवन विस्कळित झालं आहे. सोमवारी अचानक सुरू झालेल्या पावसामुळे पुणेकरांची चांगलीच तारांबळ उडाली होती. आजही सकाळपासून पावसाची संततधार कायम असून यामुळे पुणेकर वाहनधारकांना रस्त्यावरून मोठी कसरत करत वाहन चालवावे लागत आहे.**



सकाळपासून पुण्यात पावसाचा जोर कायम आहे. मुसळधार पावसामुळे शहरातील अनेक रस्त्यांना नदीची स्वरुप आले आहे. सिंहगड रस्त्यावर प्रचंड वाहतूक कोंडी झाली आहे. यामुळे आता पुणेकर वैतागले आहेत. विठ्ठलवाडी परिसरात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. मुसळधार पावसाने रस्त्यांवर खड्डे पडलेले आहेत. यामुळे वाहनांची गती मंदावली असून त्याचा थेट परिणाम वाहतूक व्यवस्थेवर झाला आहे. यामुळे प्रचंड वाहतूक कोंडी झाली आहे.

सिंहगड रस्ता हा पुण्यातील महत्त्वाच्या रस्त्यांपैकी एक रस्ता आहे. या रस्त्यावरून दररोज लाखो वाहनांची वर्दळ कायम असते. मात्र, वारंवार होणारी वाहतूक कोंडी, रस्त्यातील खड्डे, पर्यायी रस्त्यांचा अभाव यामुळे पुणेकरांचे चांगलेच हाल होत आहे. शहरातील वाहतुकीवरही पावसाचा मोठा परिणाम झाला आहे. सिंहगड रोड, कोथरूड, स्वारगेट, कात्रज आणि नगर रोड परिसरात पाणी साचल्याने वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत.

सिंहगड रस्ता जाम

सिंहगड रोडवरील नव्याने उभारण्यात आलेल्या उड्डाणपूलाचे अद्याप लोकार्पण झालेले नाही. त्यामुळे वाहतुकीचा ताण अजूनही इतर रस्त्यांवरच वाढताना दिसत आहे. विश्रांती चौक ,सिंहगड रोड येथे नवीन उड्डाण पूल येथे पालिकेने अचानक डिव्हायडरचे काम सुरू केल्याने संपूर्ण सिंहगड रोड जाम झाला आहे. याबाबत काम न करण्याचे सूचना मनपा इंजिनिअर यांना दिल्या आहेत.

# अल्बम साँगमध्ये काम देण्याच्या आमिषाने आयटीतील तरुणीवर कराडमध्ये बलात्कार

पुणे । प्रतिनिधी

सिनेमा आणि शॉर्ट फिल्म प्रोड्युसर असल्याचे सांगत आयटीमध्ये काम करणाऱ्या तरुणीला 'अल्बम साँग'मध्ये काम मिळेल या आमिषाने कराडला नेऊन बलात्कार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी चंदननगर पोलीस ठाण्यात आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



फिर्यादी २८ वर्षीय तरुणी पुण्यातील आयटी कंपनीत कार्यरत असून, अभिनयाची आवड असल्यामुळे तिने 'ओम तेजा प्रोडक्शन' नावाचा व्हॉट्सअॅप ग्रुप जॉईन केला होता. याच ग्रुपमधून विशाल दीपक (रा. कराड, जि. सातारा) या व्यक्तीने संपर्क साधला. अल्बम साँगसाठी शुटिंग करायचे असल्याचे सांगून त्याने फिर्यादीला कराडला बोलावले. ७ जून २०२५ रोजी पीडिता कराडला गेल्यानंतर दोन दिवस विविध ठिकाणी शुटिंग झाले. मात्र ९ जूनच्या संध्याकाळी आरोपीने तिला शुभम रेसिडेन्सीमधील एका फ्लॅटमध्ये नेले. तेथे कोणी नसल्याचा फायदा घेत तिला जबरदस्ती करून बलात्कार केला, असे फिर्यादीत नमूद आहे. पुण्यात परतल्यानंतर आरोपीने पीडितेला सतत फोन, मेसेज करून भेटण्याचा तगादा लावला. भेटली नाहीस तर बदनामी करीन, व्हिडीओ व्हायरल करीन अशी धमकी दिली. एवढेच नव्हे, तर १७ ऑगस्ट रोजी पुण्यात तिच्या कामाच्या ठिकाणी जात असताना आरोपीने तिचा पाठलागही केला. घाबरलेल्या पीडितेने पोलिसांना कॉल करून तक्रार नोंदवली.

गुन्हा कराड पोलिसांकडे वर्ग

या प्रकरणी चंदननगर पोलिसांनी गुन्हा दाखल करून पुढील तपासासाठी कराड पोलिसांकडे वर्ग केला आहे. आरोपीविरोधात बलात्कार, धमकी आणि ब्लॅकमेलिंगचे गंभीर गुन्हे नोंदवले गेले असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक सीमा ढाकणे यांनी दिली.

# पुण्यातील सालतर गावात हेलिकॉप्टरचं इमर्जन्सी लँडिंग; मोठी दुर्घटना टळली



पुणे । प्रतिनिधी

पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यात खराब हवामानामुळं हेलिकॉप्टरचं इमर्जन्सी लँडिंग करण्यात आलं. सालतर गाव परिसरात ही मोठी दुर्घटना टळलेली आहे. पंधरा ऑगस्टच्या या घटनेचा व्हिडीओ आता समोर आला आहे. पुण्याहून मुंबईच्या दिशेनं हेलिकॉप्टरनं टेक ऑफ घेतलं, तेव्हा टेक ऑफच्या दृष्टीने हवामान उत्तम होतं. तेव्हा दुपारच्या सव्वा तीनची वेळ होती. काही वेळात हे हेलिकॉप्टर मुळशी तालुक्यात पोहचलं. पावसाळ्यात या भागात नेहमीचं धुकं आणि रिमझिम सुरु असते. पंधरा ऑगस्ट ही तशीच परिस्थिती होती. त्यामुळं मुळशी तालुक्यात हेलिकॉप्टर भरकटले पण त्याचवेळी पायलटने प्रसंगावधान दाखवत, सुरक्षित लँडिंग केलं.


एका बाजूला मुळशी धरण आणि दुसऱ्या बाजूला अँबी व्हॅलीची दरी अशा संकटात हेलिकॉप्टर अडकलं होतं. मात्र दोन्ही पायलटने गावा लगतच्या मंदिराकडे जाणाऱ्या सिमेंटच्या रस्त्यावर हेलिकॉप्टरचं लँडिंग झालं, तेव्हा दुपारचे ३ वाजून ३५ मिनिटं झाली होती. या हेलिकॉप्टरमध्ये दोन पायलट आणि चार प्रवासी असे एकूण सहा जण होते. या सहा जणांचा जीव टांगणीला होता. ही धक्कादायक घटना गावाच्या मंदिरात उपस्थित असणाऱ्या ग्रामस्थांनी मोबाईल कॅमेऱ्यात कैद केली. पुढच्या पाच मिनिटांत हवामान अनुकूल झालं आणि हेलिकॉप्टरने मुंबईच्या दिशेने टेक ऑफ झालं.

# गणेशोत्सवासाठी पुणे पोलिसांची जय्यत तयारी सुरू

## मंडळांना सूचना, २५ ऑगस्टपर्यंत विसर्जन वादावर तोडगा

पुणे । प्रतिनिधी

यंदा गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर पुणे शहर पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी गणेश मंडळांसोबत महत्त्वपूर्ण बैठक घेतली. शहरात सुमारे ३,९०० गणेश मंडळे असून, या बैठकीला ४०० ते ५०० मंडळांचे प्रतिनिधी उपस्थित होते. गणेशोत्सव निर्बंधमुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, उत्सव सुरक्षित आणि शांततेत पार पडावा यासाठी पोलिस आणि प्रशासन सज्ज आहे.



आयुक्त अमितेश कुमार यांनी गणेश मंडळांना काही महत्त्वाच्या सूचना दिल्या. पावसाळ्याच्या काळात शॉर्ट सर्किटसारख्या दुर्घटना टाळण्यासाठी खबरदारी घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले. वादग्रस्त देखावे बनवू नयेत आणि प्रत्येक मंडळाने स्वयंसेवक नेमावेत, असे निर्देश देण्यात आले. ड्राय डे दिवशी दारूचे सेवन करून कोणीही मिरवणुकीत सहभागी होऊ नये, याची दक्षता घेण्याचे सांगण्यात आले. अवैध दारू विक्री करणाऱ्यांवर १०० टक्के कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. तसेच, विसर्जन मिरवणुकीच्या मार्गाबाबत पोलिस आणि मंडळ यांच्यात सविस्तर चर्चा होणार असून, यासाठी प्रत्येक मंडळासोबत स्वतंत्र गट तयार करून नियोजन आणि बंदोबस्ताची तयारी केली जाणार आहे.

वाहतूक आणि पादचारी व्यवस्थापनासाठी विशेष बैठक घेण्यात आली असून, अनावश्यक गर्दी टाळण्यासाठी कठोर उपाययोजना केल्या जाणार आहेत. पुणे मेट्रोचा वापर गणेशोत्सवात कसा प्रभावीपणे करता येईल, यावरही चर्चा होणार आहे. विसर्जन मिरवणुकीबाबत काही मंडळांमध्ये असलेल्या कटुतेमुळे आयुक्तांनी खेद व्यक्त केला. सर्व मंडळे आमच्यासाठी समान आहेत, कोणी छोटे किंवा मोठे नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. विसर्जन मिरवणुकीच्या वादावर २५ ऑगस्टपर्यंत सर्वांचे हित लक्षात घेऊन तोडगा काढला जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

# बनावट सोन्याने सराफांची फसवणूक करणारी टोळी जेरबंद; ८ लाखांचा मुद्देमाल जप्त

पुणे । प्रतिनिधी

पुणे शहरातील सराफ दुकानदारांची बनावट सोने तारण ठेऊन फसवणूक करणाऱ्या टोळीला गुन्हे शाखा युनिट ६ च्या पथकाने बेड्या ठोकल्या आहेत. खांदवेनगर, वाघोली परिसरात संशयास्पद हालचाल करत असलेल्या तीन संशयितांना ताब्यात घेतल्यावर त्यांच्याकडून मोठ्या फसवणूक प्रकरणाचा पर्दाफाश झाला. मागील सहा महिणे टोळीने शहर आणि पिंपरी-चिंचवड परिसरात धुमाकूळ घातला होता. दरम्यान तब्बल एक किलो सोन्याचा मुलामा दिलेले दागिणे गहाण ठेऊन सराफी बाजारातून मोठी रक्कम उचलण्याचा त्यांचा डाव होता. मात्र हा डाव अटकेमुळे उधळला गेला.

रोहित संजय गोरे (३०, रा. मोहन नगर, धनकवडी), अजय दत्तात्रय पवार ( २८, रा. वडगाव बुद्रुक) आणि ओम सुंदर खरात (वय



२३, रा. वडगाव बुद्रुक) अशी आहेत.

तपासात उघड झाले की या टोळीने शहरातील विविध पोलीस ठाण्यांत नोंद असलेल्या ४ वेगवेगळ्या गुन्ह्यांमध्ये बनावट सोने गहाण ठेवून लाखो रुपयांची फसवणूक केली आहे. त्यांच्याकडून एकूण ८ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून त्यात ३ लाख रुपये रोख, १ लाख रुपये किंमतीचे मोबाईल फोन व ४ लाख रुपये किंमतीचे हॉलमार्क बनावट सोन्याचे दागिने यांचा समावेश आहे. या आरोपींविरुद्ध चंदननगर, काळेपडळ, पर्वती व आंबेगाव पोलीस ठाण्यात गुन्हे नोंद आहेत. पुढील तपासासाठी त्यांना चंदननगर पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

यातील रोहीत गोरे याचे कपड्याचे दुकान आहे तर इतर अजय आणि ओम डिलिव्हरी बॉय म्हणून काम करतात. तीघेही एकमेकांच्या ओळखीचे असल्याने त्यांनी झटपट पैसे कमविण्याचा विचार सुरु केला होता. दरम्यान त्यांना कल्याण येथील दोन व्यक्ती भेटल्या . ते सोन्याचा मुलामा दिलेला एक तोळ्याचा दागिना , पावती, हॉलमार्कसह ३० हजाराला पुरवत होता. हाच दागिना छोट्या सराफांकडे तारण ठेऊन आरोपींना ६० हजार रुपये मिळत होते. पैसे मिळाल्यावर गोरे यातील प्रत्येकी पाच हजार उर्वरीत दोन आरोपींना देत होता. आरोपी सराफाकडे बनावट आधारकार्ड देत होते. यामुळे फसवणूक झालेल्या सराफांना त्यांचा ठावठिकाणा लागत नव्हता. दरम्यान त्यांनी एका सराफाकडे सोन्याचा मुलामा दिलेला दागिने तारण ठेवण्यात दिला होता. मात्र सराफाला तो बनावट असल्याचे आढळले. त्यांनी आरोपींना विचारणा केल्यावर त्यांनी आपल्याला काहीच कल्पना नसल्याचे सांगितले. यामुळे सराफाने तो दागिना ठेऊन घेतला. यानंतर त्याने पोलीस अंमलदार नितीन मुंढे यांना खबर दिली.

# हडपसर डीपी रस्ता भूसंपादनाला शेतकऱ्यांचा तीव्र विरोध; आंदोलनाचा दिला इशारा

हडपसर । प्रतिनिधी

लोहिया गार्डन ते वाडकर मळा या दक्षिणोत्तर १०० फुटी आणि कालव्यालगतच्या पूर्व-पश्चिम ६० फुटी डीपी रस्त्यासाठी प्रस्तावित सक्तीच्या भूसंपादनाला हिंगणे मळा, डांगमाळी मळा आणि वाडकर मळा येथील शेतकऱ्यांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. पुणे महानगरपालिकेने (पीएमसी) स्थानिकांना विश्वासात न घेता हा रस्ता रेटण्याचा प्रयत्न केल्यास तो होऊ देणार नाही, असा ठाम निर्णय बाधित शेतकऱ्यांनी घेतला आहे. यासंदर्भात हिंगणे मळा आणि वाडकर मळा येथील बाधित कुटुंबांनी आयोजित बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

या बैठकीच्या अध्यक्षस्थानी आमदार चेतन तुपे होते. यावेळी माजी राज्यमंत्री बाळासाहेब



शिवरकर, माजी नगरसेवक मारुती आबा तुपे, योगेश बापू ससाणे, सुनील बनकर, गणेश फुलारे, नितीन आरु यांच्यासह हिंगणे, ससाणे, डांगमाळी आणि वाडकर कुटुंबातील अनेक बाधित सदस्य उपस्थित होते. हिंगणे मळा आणि डांगमाळी मळा येथील सुमारे ४ ते ५ एकर जमीन भूसंपादनामुळे बाधित होणार असून, यामुळे सुमारे १०० शेतकरी कुटुंबांवर परिणाम होणार आहे.

शेतकऱ्यांनी व्यक्त केलेल्या संतापानुसार, यापूर्वी म्हाडा, कालवा, रेल्वे, उद्याने, रस्ते आणि औद्योगिक वसाहतींसाठी त्यांच्या जागा कवडीमोल भावाने घेतल्या गेल्या आहेत. आता फक्त वडिलोपार्जित घरे शिल्लक असून, तीही गमावण्याची तयारी नाही. सर्व आरक्षणे आमच्याच जमिनीवर का? हा रस्ता केवळ मोठ्या बिल्डरांच्या फायद्यासाठी आहे, असा आरोप शेतकऱ्यांनी केला. सक्तीच्या भूसंपादनाला विरोध करताना काहींनी आत्मदहन आंदोलनाचा इशाराही दिला आहे.

स्थानिक नेत्यांचा पाठिंबा

माजी नगरसेवक योगेश ससाणे यांनी बाधित कुटुंबांच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचे सांगितले. जबरदस्तीने रस्ता रेटण्याचा प्रयत्न झाल्यास तीव्र आंदोलन छेडू, असा इशारा त्यांनी दिला. भूसंपादन कायद्यानुसार ८०% स्थानिकांची संमती आवश्यक असताना महापालिका षडयंत्र रचत असल्याचा आरोप त्यांनी केला. माजी नगरसेवक मारुती आबा तुपे आणि सुनील बनकर यांनीही महापालिकेने प्रथम या भागातील इतर अडचणी नसलेले रस्ते पूर्ण करावेत, अशी मागणी केली.

माजी राज्यमंत्री बाळासाहेब शिवरकर यांनी बाधित कुटुंबांना पाठिंबा देताना म्हटले, लेखी परवानगीशिवाय रस्त्याचे काम होणार नाही.